दिव्य मातेचे चार पैलू





श्रीमाताजी

दिव्य मातेचे चार पैलू

प्रकाशक

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

प्रकाशन स्थळ

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

वर्गणीसाठी संपर्क क्र : (०४१३)–२२३१७५३

संपादक

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९ ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

मुद्रक

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

वर्गणी / देणगीदार सदस्यत्व

१ वर्ष : १८० रू. ३ वर्ष : ५२० रू. ५ वर्ष : ८६० रू. (देणगीदार) : ४००० रू.

एका अंकाची किंमत : १५ रू./–

ऑनलाईन वर्गणी वा देणगीसाठी बँकेचा तपशील

बँकेचे नाव : Central Bank of India

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society

IFSC Code : CBIN0281354 A/C No : 1235467709

सूचना : रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

अभीप्सा फेसबुक : @AbhipsaMarathiMasik

अभीप्सा

(Aspiration towards the Divine)

प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।

संपादकीय

या विश्वामध्ये कार्यरत असणाऱ्या शक्ती म्हणजे कोणत्याही अंध यांत्रिक शक्ती नसतात तर त्या जागृत शक्ती आणि जीव असतात; या शक्ती आणि हे जीव विश्वाच्या विविध कार्यांमध्ये कायम व्यस्त असतात.

या शक्ती आणि हे जीव अगणित असले तरीही अंतिमतः त्यांचे चार महान शक्तींमध्ये समावेशन करता येणे शक्य असते; एकमेव दिव्य मातेपासून प्रथमतः उदयाला आलेल्या या चार शक्ती, मानवी जीवाला आणि प्रकृतीला दिव्य मातेप्रत उन्मुख करण्याची आणि या विश्वामध्ये तिचे साधन बनण्याची तयारी करण्यासाठी साहाय्य करतात.

या शक्तींचा आणि जीवांचा ज्यांना थेट अनुभव होता ते श्रीअरविंद, त्यांच्याकडे केवळ जिवंत वास्तव आणि अस्तित्व या दृष्टीने पाहात नाहीत तर, श्रीमाताजींच्या रूपाने ती दिव्य माताच मूर्तरूपात आली आहे, या दृष्टीने त्याकडे पाहतात.

दिव्य मातेच्या चार पैलूंचा श्रीअरविंदांना जो गभीर साक्षात्कार झाला त्यास हा अंक समर्पित करण्यात येत आहे.

– संपादक, ऑल इंडिया मॅगेझिन

**

आद्यशक्ती

एकमेवाद्‌वितीय सर्वश्रेष्ठ शक्ती

श्रीमाताजींच्या चार शक्ती म्हणजे त्यांची चार अगदी अद्‌वितीय अशी व्यक्तित्वं आहेत, अंश आहेत, त्यांच्या दिव्यत्वाची मूर्त रूपं आहेत. ह्या रूपांच्या माध्यमातूनच त्या त्यांच्या प्राणिमात्रांवर कार्य करतात, त्यांना आदेश देतात, या जगतातील त्यांच्या निर्मितीमध्ये सुमेळ निर्माण करतात आणि ह्या रूपांच्या माध्यमातूनच श्रीमाताजी त्यांच्या हजारो शक्तींच्या कार्याला दिशा देतात. श्रीमाताजी एकच आहेत, परंतु त्या आपल्या समोर विभिन्न रूपे धारण करून येतात; त्यांच्या शक्ती आणि व्यक्तित्वं अनेक आहेत, त्यांच्या विभूती आणि त्यांचे अंशावतार अनेक आहेत; ते सर्व या विश्वामध्ये श्रीमाताजींचे कार्य करतात. ज्यांची आपण 'श्रीमाताजी' म्हणून आराधना करतो, त्या म्हणजे अखिल अस्तित्वावर प्रभुत्व असणारी ईश्वराची चित्शक्ती आहे, ती चित्शक्ती 'एक' असूनही इतकी 'अनेकअंगी' आहे की, तिच्या गतिविधींचे अनुसरण करणे हे अत्यंत चपळ मनाला किंवा सर्वस्वी मुक्त आणि अत्यंत विशाल बुद्धिलादेखील अशक्य असते. श्रीमाताजी ह्या परमेश्वराची चेतना आणि शक्ती असून, त्या त्यांनी निर्माण केलेल्या निर्मितीपासून, सृष्टीपासून खूपच दूर उच्चस्थानी आहेत. परंतु असे असूनसुद्धा, श्रीमाताजींच्या कार्यपद्धतींमधील काही गोष्टी ह्या त्यांच्या मूर्त रूपांच्या द्‌वारे म्हणजे देवतारूपांच्या द्‌वारे आपणास पाहता आणि अनुभवता येऊ शकतात. कारण, ज्या देवतारूपांच्या माध्यमातून श्रीमाताजी, त्यांनी निर्माण केलेल्या जीवसृष्टीसमोर प्रकट होण्याचे मान्य करतात, त्या देवतारूपांचा स्वभाव आणि कार्य अधिक सुनिश्चित आणि समर्याद असते त्यामुळे त्यांच्या माध्यमातून, श्रीमाताजींच्या कार्यपद्धतीचे आपणास अधिक सुस्पष्टपणे आकलन होऊ शकते.

या विश्वाला आणि आपल्याला धारण करणारी जी चित्शक्ती आहे तिच्याशी झालेल्या एकत्वाच्या स्पर्शामध्ये तुमचा प्रवेश झाला की,

श्रीमाताजींच्या अस्तित्वाच्या तीन रूपांबद्दलची जाणीव तुम्हाला होते. ‘विश्वातीत’, आद्य ‘परम शक्ती’चे, स्थान सर्व विश्वांच्या वर असते आणि ती या सृष्टीला ’परमेश्वरा’च्या आजवर आविष्कृत न झालेल्या अशा रहस्याशी जोडते. ‘विश्वात्मक’, वैश्विक ‘महाशक्ती’, ही सर्व जीवांची निर्मिती करते, त्यांना धारण करते, त्यांच्यामध्ये प्रविष्ट होते आणि या सर्व लाखो प्रक्रियांना व शक्तींना चालविते आणि त्यांना आधार देते. ‘व्यक्तिगत’रित्या ती, तिच्या अस्तित्वाच्या या दोन विशाल रूपांचे सामर्थ्य मूर्तरूपात आणते, त्यांना ती जिवंत करते आणि आपल्या निकट आणते आणि मानवी व्यक्तित्व व दिव्य प्रकृती यांच्यामधील मध्यस्थ बनते.

त्या एकमेवाद्वितीय आद्य सर्वश्रेष्ठ शक्तीचे, दिव्य मातेचे स्थान सर्व विश्वांच्या वर असते आणि ती स्वतःमध्ये ‘परम ईश्वरा’ची शाश्वत चेतना वागवते. ती एकाकीपणे, परम ’शक्ती’ आणि अनिर्वचनीय असे अस्तित्व स्वतःमध्ये साठवून असते; आविष्कृत होणेच आवश्यक आहेत अशा ‘सत्यां’ना तिने साद घातलेली असते; अशी सत्यं तिने स्वतःमध्ये सामावून घेतलेली असतात; तिच्या अनंत चेतनेच्या प्रकाशामध्ये गुप्त असणारी ही जी सत्यं, त्यांना ती ‘परमरहस्या’मधून खाली आणते आणि तिच्या सर्वसामर्थ्यवान शक्तीमध्ये व तिच्या असीम जीवनामध्ये आणि तिच्या विश्वगत शरीरामध्ये, ती त्यांना शक्तिरूप प्रदान करते. परमेश्वर तिच्यामध्ये शाश्वत सच्चिदानंद म्हणून कायमस्वरूपी आविष्कृत झालेला असतो; तिच्याद्वारे तो विश्वांमध्ये ईश्वर–शक्ती या एका आणि दुहेरी चेतनेमध्ये आणि पुरुष–प्रकृती या दुहेरी तत्त्वांद्वारे आविष्कृत झालेला आहे; तिच्याद्वारे त्याने विश्वांमध्ये आणि विविध स्तरांवर, देवदेवता आणि त्यांच्या शक्ती यांच्या माध्यमातून मूर्त रूप धारण केले आहे; आणि ज्ञात तसेच अज्ञात विश्वांमधील सर्वकाही तिच्यामुळे साकार झाले आहे. ही सर्व तिची परमेश्वराबरोबर चाललेली लीला आहे. हे सर्व शाश्वत–ब्रह्माच्या रहस्याचे तिने केलेले आविष्करण आहे; हे सर्व त्या अनंताचे

चमत्कार आहेत. सर्व तीच आहे कारण सारेच तिच्या दिव्य 'चित्शक्ती'चे अगदी अविभाज्य असे भाग आहेत. ती जे ठरवेल आणि परमेश्वर ज्याला मान्यता देईल त्याच्या व्यतिरिक्त येथे किंवा अन्यत्र काहीच असू शकत नाही; तिच्या सर्वोच्च ज्ञानाद्‌वारे तिने जे संचलित केलेले असते त्या व्यतिरिक्त अन्य काहीही आकाराला येऊ शकत नाही आणि तिच्या सर्जक आनंदामध्ये असताना तिने बीजामध्ये जे ओतलेले असते त्यानंतर त्याव्यतिरिक्त अन्य कोणतेच रूप व्यक्त होऊ शकत नाही.

परमेश्वराकडून, विश्वातीत चेतनेद्‌वारे जे जे काही संक्रमित झालेले असते त्यावर महाशक्ती, विश्वात्मक माता कार्य करते आणि तिने निर्माण केलेल्या विश्वांमध्ये ती प्रविष्ट होते; तिच्या उपस्थितीमुळे ती विश्वं दिव्य चैतन्याने आणि दिव्य विश्वंभर शक्तीने व आनंदाने भरून जातात आणि या साऱ्या गोष्टींचा त्या विश्वांना आधार मिळतो; तसे नसते तर ती विश्वं अस्तित्वातच राहू शकली नसती. ज्याला आपण 'निसर्ग' वा 'प्रकृती' असे संबोधतो तो तिचा अगदी बाह्यवर्ती कार्यकारी असा पैलू असतो; ती तिच्या सर्व शक्तींमध्ये आणि प्रक्रियांमध्ये सुमेळ निर्माण करते आणि त्यांना क्रमबद्ध करते; ती प्रकृतीच्या क्रियांना प्रेरणा देते आणि जे काही पाहता येते, अनुभवता येते किंवा जीवनव्यवहारामध्ये आणता येते त्या साऱ्यांमध्ये ती गुप्तपणाने किंवा प्रकटपणाने त्यांच्याबरोबर चालत राहते. यातील प्रत्येक विश्व म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, या विश्वांच्या वा ब्रह्मांड-व्यवस्थेच्या महाशक्तीची एक लीला आहे; जी महाशक्ती तेथे ब्रह्मांड-आत्मा आणि विश्वातीत मातेचे व्यक्तित्व म्हणून उपस्थित आहे. हे प्रत्येक विश्व म्हणजे असे काही आहे की, जे तिच्या दिव्यदृष्टीला दिसले, जे तिने तिच्या सौंदर्य आणि शक्तियुक्त हृदयामध्ये साठवले आणि तिच्या 'आनंदा'मध्ये तिने निर्माण केले.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 14-15)

*

'आद्यशक्ती' ही मूलभूत 'शक्ती' आहे, त्यामुळे ती 'श्रीमाताजीं'चे परमोच्च रूप आहे. मात्र इतकेच की, एखादी व्यक्ती ज्या स्तरावरून त्या आद्यशक्तीकडे पाहते त्या स्तरानुसार ती आद्यशक्ती भिन्न भिन्न प्रकारे अभिव्यक्त होते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 66)

*

दुःखभोग आणि ज्ञानावस्था

प्रश्न : जेव्हा ईश्वर मानवी दुःख स्वतःवर ओढून घेतो तेव्हा त्या दुःखभोगाचा ईश्वरावरही आपल्यासारखाच परिणाम होतो का? म्हणजे असे की, आपल्याला ज्याप्रमाणे वेदना आणि दुःख जाणवते तसेच ते त्यालासुद्धा जाणवते का?

श्रीमाताजी : नाही, नक्कीच नाही. कारण, अज्ञानाची दशा आणि ज्ञानावस्था यामध्ये अर्थातच मूलभूत फरक आहे. समजा, तुमच्या बाबतीत दुःखद असे काहीतरी घडले तर; अज्ञानदशेमध्ये ही वेदनादायी गोष्ट एक विशिष्ट गुणधर्म धारण करते. परंतु तुम्ही ज्ञानावस्थेत असताना जर का तुमच्या वाट्याला तीच दुःखद गोष्ट आली तर तुमच्यावर तिचा तसाच परिणाम होत नाही.

एक अगदी भौतिक उदाहरण पाहू, म्हणजे, समजा अगदी शारीरिक मार लागला... (श्रीमाताजी मार बसल्यासारखे हाताने करून दाखवितात.) तर, व्यक्ती जेव्हा सामान्य मानवी अज्ञानदशेमध्ये असते तेव्हा या माराचा जबर परिणाम दिसून येतो. तो परिणाम पूर्णपणे त्यातील हिंसकतेवर अवलंबून असतो, म्हणजे तो मार कोणी दिला आहे आणि तो मार कोणाला लागला आहे, यावर ते अवलंबून असते.

पण एखादी व्यक्ती अज्ञानी नसेल, तिच्याकडे ज्ञान असेल आणि अशा व्यक्तीला जरी अगदी तसाच मार, त्याच प्रकारे, त्याच वस्तुने लागला तरी त्याच्या शरीराची अगदी सहजस्वाभाविक प्रक्रियाच अशी असते की,

ज्यामुळे होणारे परिणाम अगदी कमीत कमी असतात. आणि ही अगदी वस्तुस्थिती आहे. कधीकधी तर, त्याचे परिणाम अगदी शून्यवत होतील इतक्या स्तरापर्यंत ही गोष्ट जाऊ शकते. ही गोष्ट इतक्या स्तरापर्यंत जाऊ शकते की, ती ते परिणाम पूर्ण नाहीसे करून टाकू शकते, कारण तेथे अज्ञानातून आलेल्या प्रतिक्रियेऐवजी ज्ञानातून उदयाला आलेली प्रतिक्रिया असते. त्यामुळे या दोन्ही गोष्टी एकच आहेत असे म्हणता येणार नाही.

नैतिक गोष्टींच्या बाबतीत तर हे अधिकच स्वाभाविक आहे. कारण सर्वसाधारण भावनांची सगळी अहंभावात्मक अंधता ज्यामध्ये भरलेली आहे असा एखादा भावनिक धक्का ज्ञानवंत व्यक्तीला बसला तर ती व्यक्ती त्याकडे वस्तुनिष्ठपणे पाहील, त्याचे स्वरूप काय आहे, त्याच्या स्पंदनांमध्ये कोणकोणत्या गोष्टींची सरमिसळ झाली आहे, हे ती व्यक्ती पाहील आणि त्वरित त्यावर ज्ञान, सत्य आणि प्रकाश यांचा झोत टाकेल आणि मग साऱ्या गोष्टी पुन्हा एकदा त्यांच्या त्यांच्या योग्य स्थानी ठेवल्या जातील. हे अगदी त्वरित घडते.

पण मी पुन्हा सांगते की, अगदी जडभौतिक शरीरावरील, अगदी भौतिक प्रकारे घडणारे परिणामसुद्धा एकसारखे नसतात. शिवाय, हे समजायला अगदी सोपे आहे की, जर ते परिणाम तसे एकसारखेच होत असते तर ईश्वराने आपल्या स्वतःवर वाईट गोष्ट ओढवून घेणे हे कोणत्याच प्रकारे आनंददायी परिणाम करणारे ठरले नसते! कारण मग त्या गोष्टी जशा आहेत अगदी तशाच राहिल्या असत्या आणि हे विश्वसुद्धा आत्ता जसे आहे तसेच राहिले असते. अशा अंधकारमय स्पंदनांचे रूपांतर प्रकाशाच्या स्पंदनांमध्ये करण्याचे सामर्थ्य त्या ईश्वराकडे असल्यामुळेच तो प्रत्येक गोष्ट स्वतःवर ओढवून घेतो. अन्यथा, हे सारे व्यर्थच ठरले नसते तर, ते अशक्यप्रायदेखील झाले असते, ते सारे अर्थहीन ठरले असते.

– श्रीमाताजी (CWM 06 : 286-288)

**

चार महान पैलू

दिव्य मातेचे चार पैलू

ह्या ऐहिक लीलेमध्ये श्रीमाताजींचा जो व्यवहार चालतो, त्यांचे ह्या विश्वाला जे मार्गदर्शन लाभते त्यामध्ये, श्रीमाताजींचे चार महान पैलू, चार नेतृत्वकारी शक्ती आणि त्यांची व्यक्तित्वं अग्रस्थानी आहेत.

त्यांचे एक व्यक्तित्व म्हणजे शांत व्यापकता आणि आकलनकारी प्रज्ञा, प्रशांत कृपा आणि अक्षय करुणा आणि सार्वभौम व राज्यपदाला मागे टाकणारी, सर्व–सत्ताक महत्ता.

दुसरे व्यक्तिक्त म्हणजे श्रीमाताजींच्या गौरवशाली सामर्थ्याची शक्ती, दुर्दम्य आवेग, त्यांची युयुत्सू भाववृत्ती, त्यांचा अत्याधिक तीव्र संकल्प, त्यांची त्वेषपूर्ण चपळता आणि विश्वाला हलविणारी ताकद.

त्यांचे तिसरे व्यक्तित्व म्हणजे प्रफुल्ल, मधुर, सौंदर्याच्या गुप्त रहस्याची अद्‌भुतता, सुसंवाद, उत्कृष्ट लयतालबद्‌धता, गहन व सूक्ष्म समृद्धी, श्रीमाताजींचे खिळवून ठेवणारे आकर्षण व मनोहर कृपा.

त्यांचे चौथे व्यक्तित्व हे, तादात्म्यातून येणाऱ्या ज्ञानाची घनिष्ठ व गभीर क्षमता; काळजीपूर्वक व निर्दोष असे कर्म आणि स्थिरता व सर्व गोष्टींमधील अचूक परिपूर्णता, या साऱ्याने सुसज्ज असते. 'प्रज्ञा, सामर्थ्य, सुसंवाद आणि परिपूर्णता' असे त्यांचे विविध गुणधर्म आहेत. ह्याच शक्तींसमवेत श्रीमाताजींची वरील चारही व्यक्तिमत्त्वं ह्या जगतामध्ये (मानवी प्रमाणात) येतात. त्यांच्या या शक्ती विभूतींच्या माध्यमातून (अर्ध–दैवी प्रमाणात) मानवी रूप धारण करून, आविष्कृत होतात. श्रीमाताजींच्या थेट व जिवंत प्रभावाला जी व्यक्ती स्वतःची पार्थिव प्रकृती खुली करू शकते, तिच्या ह्या आरोहणामध्ये, हे गुणधर्म ईश्वरी प्रमाणात आढळून येतात.

या चारही व्यक्तित्वांना आम्ही चार महान नावं दिली आहेत,

महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 17-18)

*

महाशक्ती आणि दिव्य मातेची चार रूपे

प्रश्न : ही चार रूपं एकमेकांपासून स्वतंत्र आहेत का?

श्रीमाताजी : हो, काही विशिष्ट मर्यादेपर्यंत, परंतु पूर्णपणे नाहीत. कधीकधी एकमेकांपासून अगदी स्वतंत्र भासतील इतकी ती रूपं पूर्णपणे भिन्न असतात आणि त्याच वेळी त्यांच्यामध्ये एक अगदी घनिष्ठ दुवा असतो. किंबहुना, तसे म्हणायचे झाले तर, त्या एकच, केवल असतात.

या जडभौतिक विश्वामध्ये केंद्रवर्ती चेतना म्हणायची झाली तर ती 'महाशक्ती' असते. जरी हे विविध पैलू परस्परांपासून काहीसे स्वतंत्र असले आणि त्यांच्या त्यांच्या स्वतःच्या अभीप्सांनुसार कार्यरत असले तरीदेखील या पैलूंच्या कार्याचे नियमन करण्याची शक्ती नेहमीच तिच्यामध्ये असते. आणि ती त्यांच्यावर नियंत्रण ठेवू शकते.

उदाहरणादाखल कालीचे उदाहरण घेऊ. जर 'काली'ने हस्तक्षेप करायचा असे ठरविले असेल आणि 'महाशक्ती' की, जिच्याकडे स्वाभाविकपणेच गोष्टींकडे पाहण्याची अधिक समग्र आणि अधिक व्यापक दृष्टी असते, तिला जर असे आढळले की, हस्तक्षेप करण्याची ही योग्य घटिका नाही किंवा तेथे घाई होत आहे तर, ती 'महाकाली'वर अगदी सहजपणे दबाव टाकू शकते आणि तिला सांगू शकते, ''शांत राहा.'' आणि मग महाकालीला शांत राहण्यावाचून पर्यायच राहत नाही आणि असे असूनसुद्धा ती बऱ्यापैकी स्वतंत्रपणे कार्य करत असते.

प्रश्न : पण ती महाकालीला तिचे कार्य का करू देत नाही? कारण इथे श्रीअरविंद असे म्हणतात की, ''जे करायला शतकांचा काळ लोटला असता ते 'महाकाली'च्या हस्तक्षेपाने अगदी आत्तासुद्धा घडून येऊ शकते.''

श्रीमाताजी : मी म्हणते, त्यासाठीच 'महाकाली' असते आणि ती तिचे कार्य करत असते.

परंतु कार्याकडे पाहण्याची महाकालीची एक विशिष्ट पद्धत असते... तिला कार्याची फक्त स्वतःचीच बाजू दिसत असते आणि महाशक्तीला मात्र समग्रपणे दिसत असते, तेव्हा ती सांगते, ''नाही, आत्ता ही योग्य वेळ नाही.''

– श्रीमाताजी (CWM 06 : 289-290)

**

प्रश्न : आज प्रणामाच्या वेळी मला श्रीमाताजींकडून एक सुवर्णमयी धाग्यासारखा प्रकाश माझ्याकडे येताना दिसला, परंतु तो काही क्षणातच नाहीसा झाला. पूर्वी एकदा जिन्यावरून खाली येण्यापूर्वी काही क्षणच आधी जेव्हा श्रीमाताजी गच्चीवर उभ्या होत्या, तेव्हाही मला असाच प्रकाश दिसला होता...

श्रीअरविंद : सामान्य मानवी मनाच्या वर असलेल्या उच्चतर स्तरावरील दिव्य सत्याचा प्रकाश हा सुवर्णमय प्रकाश असतो; हा प्रकाश मूळ स्वरूपात अतिमानसिक प्रकाश असतो. हा प्रकाश मनाच्या वर असलेल्या महाकालीचासुद्धा असतो. श्रीमाताजींकडून पांढऱ्या शुभ्र प्रकाशाप्रमाणेच बरेचदा सुवर्णमय प्रकाशसुद्धा प्रस्फुरित होताना दिसून येतो.

*

प्रश्न : एके रात्री मला अगदी शीतल, शांतीपूर्ण, विशाल असा, पिवळसर पांढरा प्रकाश वरून खाली येताना दिसला...

श्रीअरविंद : जर तो सोनेरी पांढरा प्रकाश असेल तर, तो मनाच्या वरच्या पातळीवरून आलेला असतो आणि तुम्ही जी रंगसंगती सांगितलीत त्यावरून तो महेश्वरी–महाकाली शक्तीचा प्रकाश असावा असे सूचित होते. उच्चतर मनाचा रंग फिकट निळा असतो.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 267-268), (CWSA 32 : 268)

*

महेश्वरी

सार्वभौम महेश्वरी

इच्छाशक्तीच्या आणि विचारी मनाच्या वर असणाऱ्या विशालतेमध्ये सार्वभौम असणाऱ्या महेश्वरीचे वास्तव्य असते आणि ती या विचारी मनाला व इच्छाशक्तीला उदात्त करते आणि त्यांना प्रज्ञेमध्ये व व्यापकतेमध्ये वृद्धिंगत करते किंवा त्यांच्या अतीत असणाऱ्या वैभवामध्ये त्यांना न्हाऊ घालते. कारण ती बलशाली आणि प्रज्ञावान आहे; ती अतिमानसिक अगणिततेप्रत आणि वैश्विक विशालतेप्रत, परम प्रकाशाच्या वैभवाप्रत, अद्भुत ज्ञानाच्या गुप्त खजिन्याप्रत, दिव्य मातेच्या शाश्वत शक्तींच्या अगणित गतिविधींप्रत आपल्याला उन्मुख करते. ती अगदी समचित्त, अद्भुत, महान आणि सदैव शांत अशी असते.

तिला कोणतीच गोष्ट विचलित करू शकत नाही कारण सारे ज्ञान तिच्यामध्येच सामावलेले असते; तिला जे जाणून घेण्याची इच्छा असते अशी कोणतीच गोष्ट तिच्यापासून लपून राहू शकत नाही; सर्व वस्तू, सर्व जीव, त्यांची प्रकृती आणि त्यांना कोण चालवू शकते, विश्वाचा कायदा, त्याचे काळ आणि सारे काही कसे होते, कसे आहे आणि कसे असले पाहिजे या साऱ्याचे तिला आकलन असते. तिच्यामधील सामर्थ्य प्रत्येक गोष्टीचा सामना करते आणि त्यावर प्रभुत्व मिळविते आणि तिच्या विशाल अस्पर्श्य प्रज्ञेच्या समोर आणि उच्च निश्चल शक्तीसमोर अंततः कोणाचाच टिकाव लागू शकत नाही. समत्व, धीर असणारी आणि संकल्पाबाबत अढळ असणारी ती माणसांशी त्यांच्या प्रकृतीनुसार वागते; आणि वस्तुमात्रांना आणि घटनांना, त्यांच्या शक्तीनुसार व त्यांच्यात अंतर्हित असणाऱ्या सत्यानुसार हाताळते.

तिच्यामध्ये पक्षपातीपणा नसतो, पण ती परमेश्वराच्या निर्णयाचे अनुसरण करते आणि काही जणांचा ती उद्धार करते आणि काही जणांना ती खालीच सोडून देते किंवा काही जणांना ती तिच्यापासून दूर

अंधकारामध्ये नेऊन ठेवते. जे प्रज्ञावान आहेत त्यांना ती अधिक महान आणि अधिक प्रकाशमय प्रज्ञा प्रदान करते; ज्यांच्यापाशी दृष्टी आहे त्यांना ती तिच्या सल्लागारपदी प्रविष्ट करून घेते; जे विरोधक आहेत त्यांना ती त्यांच्या विरोधाचे परिणाम भोगायला लावते; अज्ञानी आणि मूर्ख लोकांना ती त्यांच्या अंधतेनुसार मार्ग दाखविते. प्रत्येक माणसाला ती प्रतिसाद देते आणि त्याच्या प्रकृतीच्या वेगवेगळ्या घटकांना त्यांच्या गरजेप्रमाणे, त्या घटकांच्या इच्छेप्रमाणे आणि त्यांना ज्या प्रतिसादाची अपेक्षा असते त्यानुसार हाताळते; ती त्यांच्यावर आवश्यक तेवढा दबाव टाकते किंवा त्यांना ज्या प्रकारे अज्ञानामध्ये बहरून यायचे आहे त्या त्यांच्या वांछित स्वातंत्र्यामध्ये ती त्यांना सोडून देते किंवा त्यांना नष्ट होण्यासाठी सोडून देते.

कारण ती सर्वांच्या अतीत आहे, ती कशानेही बांधली गेलेली नाही, या ब्रह्मांडामध्ये ती कोणाविषयीही आसक्त नाही. आणि तरीदेखील इतर कोणाकडेही नसेल असे विश्वात्मक 'माते'चे हृदय तिच्याकडे आहे. कारण तिची करुणा अनंत आणि अक्षय आहे; सारेजण जणू काही तिच्या दृष्टीने तिची बालकेच असतात आणि सारे जण अगदी असुर, राक्षस आणि पिशाच्च आणि बंडखोर आणि विरोधक सुद्धा, त्या एकमेवाद्वितीयाचे भाग असतात. तिने दिलेला नकार हा नकार नसतो, तर तो केवळ विलंब असतो; तिची शिक्षा म्हणजे देखील एक प्रकारे कृपाच असते. परंतु तिची करुणा तिच्या प्रज्ञेला अंध बनवीत नाही किंवा नियत घटनाक्रमापासून तिच्या कृती पाठही फिरवीत नाहीत; कारण वस्तुमात्रांचे सत्य हा तिचा आस्थाविषय असतो, ज्ञान हे तिच्या शक्तीचे केंद्र असते आणि आपल्या (माणसाच्या) आत्म्याची आणि आपल्या (माणसाच्या) प्रकृतीची दिव्य सत्यामध्ये घडण करणे हे तिचे जीवितकार्य असते, त्यासाठी तिचे परिश्रम असतात.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 18-19)

*

ईश्वरी संकल्पशक्ती

प्रश्न : ''इच्छाशक्तीच्या आणि विचारी मनाच्या वर असणाऱ्या विशालतेमध्ये सार्वभौम असणाऱ्या महेश्वरीचे वास्तव्य असते...'' मानसिक आणि प्राणिक स्तराप्रमाणेच इच्छाशक्तीचा पण एक स्तर असतो का?

श्रीमाताजी : मी तुम्हाला त्याचे स्पष्टीकरण सच्चिदानंदाच्या संदर्भात केले होते. सर्व विश्वांच्या उगमापूर्वी सच्चिदानंद तत्त्व अस्तित्वात असते, परंतु जिवाच्या सर्व अवस्थांच्या पाठीमागेदेखील सच्चिदानंदच असते.

तुम्ही एक आकृती काढू शकता (अर्थात त्याने काही फारसे स्पष्टीकरण होईल असे नाही, ती काहीशी सदोष कल्पना असेल, परंतु त्यामुळे गोष्टी आकलनासाठी सोप्या होतील.) तुम्ही जिवाच्या अवस्था श्रेणींनुसार मांडा. खालच्या बाजूला पृथ्वी असेल आणि वरच्या बाजूला परमेश्वर असेल. (वास्तविक हे असे नसते, मी तुम्हाला सांगण्याची काहीशी घाई करत आहे, पण असो, त्यामुळे समजायला सोपे जाईल.) तुम्ही तळाशी पृथ्वी आणि अगदी वर परमेश्वर दाखवा आणि या दोहोंमधील भागाचे अनेक लहान लहान भागांमध्ये विभाजन करा, त्यातील प्रत्येक भाग हा जिवाची एकेक अवस्था दर्शवेल; म्हणजे ती एकप्रकारे शिडीसारखी आकृती होईल. आणि मग, या शिडीच्या पाठीमागे, तिला आधार देणारी अशी एक गोष्ट असेल, की जिच्यावर ती शिडी टेकवलेली असेल. ती भिंत नसेल पण त्या शिडीला जिच्यामुळे आधार मिळेल अशी काहीतरी ती गोष्ट असेल. आणि विश्वात्मक आकाराचे तेच नेमके पहिले तत्त्व असते.

हिंदू परिभाषेमध्ये त्यालाच 'सच्चिदानंद' असे संबोधले जाते. ते तेथे असतेच, सारे काही त्या तत्त्वावरच आधारलेले आहे, ते नसेल तर काहीच अस्तित्वात असू शकणार नाही. तेच जीवनाची धारणा करते आणि जीवनाला संमती देते.

मग, जर तुम्ही चेतनेच्या एका विशिष्ट स्थितीमध्ये प्रवेश केलात आणि जर का, तुम्ही उच्चतर मनाच्या श्रेणीमध्ये आहात असे तुम्हाला

दिसून आले, (कारण सर्वसाधारणपणे, या श्रेणीमध्ये हे सहजतेने घडून येते; तुम्ही शारीरिक श्रेणीपासून सुरुवात केलेली असते आणि पायरी पायरीने चढत चढत, उच्चतर मनाच्या श्रेणीपर्यंत येऊन पोहोचलेले असता.) पण त्या शिडीवर चढणे तसेच चालू ठेवण्याऐवजी जर तुम्ही एक प्रकारच्या आंतरिकीकरणामध्ये प्रवेश केलात आणि आकाराच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न केलात तर, त्या देहाकाराच्या बाहेर असलेल्या एक प्रकारच्या शांतीमध्ये तुम्ही प्रविष्ट होता. त्या शिडीच्या दोन पायऱ्यांच्या मधून तुम्ही पलीकडे जाता आणि सगळ्या गोष्टींना आधार पुरविणाऱ्या सच्चिदानंदामध्येच थेट प्रवेश करता. आणि मग तेव्हा तुम्हाला सच्चिदानंदाचा मानसिक अनुभव येऊ शकतो.

मला अशी काही माणसं माहीत आहेत की ज्यांना असा अनुभव आला होता आणि त्यांना असे वाटू लागले की, ते परमेश्वराच्या शिखरस्थानी जाऊन पोहोचले आहेत. कारण या अनुभवाचे त्या अनुभवाशी साधर्म्य असते, खूपच साधर्म्य असते; फरक एवढाच असतो की हा अनुभव मनापुरताच मर्यादित असतो, म्हणजे यामध्ये एकटे मनच तेवढे सहभागी झालेले असते.

इच्छाशक्तीच्या बाबतीतही हे असेच असते. शिडीला आधार देण्याऐवजी, ती एक प्रकारची शक्ती असते, एक अतिशय शक्तिशाली प्रवाह असतो की जो सर्व अवस्थांमधून प्रवाहित होत असतो, त्याचा प्रारंभ वरून होतो – ती परम इच्छा असते – आणि तिचे आविष्करण जडभौतिकापर्यंत झालेले असते. त्यामुळे, जर तुमची या स्पंदनाशी किंवा त्या शक्तीशी एक प्रकारची आत्मीयता निर्माण झाली तर, तुम्ही 'संकल्पावस्थे'मध्ये प्रवेश करता, म्हणजे, तुम्ही तुमच्या अस्तित्वाच्या दृष्टीने कोणत्याही अवस्थेत असाल – शारीरिक, प्राणिक, मानसिक इ. – जर तुम्ही चेतनेच्या आणि शक्तीच्या एका विशिष्ट अवस्थेमध्ये प्रवेश केलात तर, तुम्ही या संकल्पशक्तीच्या संपर्कात येता : ती तुमच्यामध्ये

प्रविष्ट होते आणि मग तुम्ही तिचा कोणत्याही हेतूसाठी उपयोग करू शकता. जर तुमचा स्वीकार हा सर्व अहंकारविरहित असेल, जर तुम्ही शुद्ध, पूर्णपणे समर्पित असाल आणि ईश्वराकडून जे येते त्याचाच फक्त स्वीकार करत असाल आणि तुम्ही त्यामध्ये इतर कोणत्याही गोष्टींची, अहंकार किंवा इच्छावासना किंवा मर्यादा... या कशाचीही भेसळ करत नसाल तर... (ही अवस्था प्राप्त करून घेणे ही काहीशी अवघड गोष्ट आहे, पण जर का तुम्ही ती प्राप्त करून घेतलीत तर,) तुम्हाला ही संकल्पशक्ती तिच्या मूळ अवस्थेमध्ये, विशुद्ध स्वरूपात प्राप्त होते (कारण ती खाली येताना विशुद्ध असते, तिचे ग्रहण केले जात असताना केवळ तिचे विरूपीकरण होते.) तेव्हा, ती तुमची इच्छा न राहता, ती ईश्वरी 'संकल्पा'ची अभिव्यक्ती बनते. आणि तुम्हाला शरीर सोडावे न लागता हे सारे काही घडून येते – म्हणजे देहत्याग करावा न लागता तुम्ही ईश्वरी संकल्पशक्ती ग्रहण करू शकता. फक्त एवढेच आहे की, तिचे ग्रहण करत असताना, तिच्यामध्ये तुम्ही बदल करता कामा नये किंवा तिला विरूप करता कामा नये, किंवा ती बिघडवूनही टाकता कामा नये.

जेव्हा काहीतरी प्राप्त करून घेण्यासाठीची एक प्रकारची दुर्दम्य शक्ती तुमच्यामध्ये तुम्हाला जाणवते, जेव्हा तुम्ही स्वतःशीच असे म्हणता, ''काहीही झाले तरी मी ही गोष्ट करणारच, मी या गोष्टीच्या मुळापर्यंत जाईन आणि त्यासाठी मी माझी इच्छाशक्ती पणाला लावेन'' (तुम्ही नेहमी 'माझी' इच्छाशक्ती असे म्हणता); पण जोवर तुम्ही ईश्वरी संकल्पशक्तीच्या प्रवाहाच्या संपर्कात येत नाही तोवर तुम्ही त्या अवस्थेप्रत पोहोचू शकत नाही.

मात्र तुमच्या छोट्याशा वैयक्तिक प्रतिक्रियेमुळे, साहजिकपणेच तुम्ही तिला विरूपित करता आणि ती चुकीच्या पद्धतीने वापरता, आणि मग तुमचा इतर घटकांशी संघर्ष होतो.

परंतु जर का तुम्ही खरोखरच योगी असाल, तर तुम्ही तो

शक्तिप्रवाह स्वीकारता आणि मग तुमच्या कृतीच्या उत्साहाला अगदी भौतिकार्थानेदेखील कोणीही रोखू शकत नाही.

– श्रीमाताजी (CWM 04 : 398-400)

*

प्रश्न : जडभौतिक सृष्टीच्या निर्मितीच्या आधी, प्राणिक आणि मानसिक विश्वं अस्तित्वात होती आणि त्याच्याही आधी उच्चतर गोलार्धातील स्तर अस्तित्वात होते. या स्तरावरील देव हे रूप आणि आकारासहित अस्तित्वात असतात की, ते निराकार निर्व्यक्तिक शक्ती स्वरूपात असतात?

श्रीअरविंद : देवदेवतांची जी रूपं स्वीकारणे माणसाला शक्य होईल अशी रूपं मनुष्य तयार करू शकतो; परंतु ज्या स्तराशी देव संबंधित असतात त्या स्तरावरूनच मानवाच्या मनामध्ये या रूपांची प्रेरणा मिळालेली असते.

या समग्र सृष्टीच्या दोन बाजू आहेत, साकार आणि निराकार. देवदेवतासुद्धा निराकार असतात आणि असे असूनदेखील त्या साकारसुद्धा असतात. परंतु परमदेवता मात्र अनेक रूपं धारण करू शकते, इथे 'महेश्वरी', तर तिकडे 'पल्लास अथेन' (एक ग्रीक देवता.)

महेश्वरीची, तिच्या स्वतःच्याच गौण आविष्करणामध्ये, दुर्गा, उमा, पार्वती, चंडी अशी अनेक रूपं आहेत.

देवदेवता या मानवी रूपांपुरत्याच मर्यादित नाहीत – आणि मनुष्याने देखील त्यांना नेहमीच मानवी रूपांमध्येच पाहिले आहे, असेही नाही.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 67)

**

'अभीप्सा'च्या वाचकांना नम्र विनंती : आपल्या काही सूचना किंवा प्रतिक्रिया असतील तर त्या editorabhipsa2018@gmail.com पत्त्यावर पाठवाव्यात.

महाकाली

महाकालीचे स्वरूप

महाकालीची प्रकृती निराळी असते. व्यापकता नव्हे तर उंची, प्रज्ञा नव्हे तर शक्ती आणि सामर्थ्य या तिच्या वैशिष्ट्यपूर्ण शक्ती असतात. तिच्यामध्ये एक अत्याधिक प्रबलता असते, प्राप्त करून घेण्यासाठी शक्तीचा एक प्रचंड आवेग असतो, प्रत्येक मर्यादा आणि अडथळा यांचा चक्काचूर करण्यासाठी तुटून पडणारी ईश्वरी उग्रता तिच्यामध्ये असते. तिची सारी दिव्यता ही वादळी कृतीच्या वैभवाद्वारे बाहेर उसळते; वेगवानता, त्वरित परिणामकारक प्रक्रिया, शीघ्र आणि थेट दणका, आणि ज्यापुढे सारे काही धुवून निघेल असा समोरून केलेला वार यासाठी महाकाली असते.

असुरांसाठी तिची मुद्रा भयावह असते; ईश्वराचा द्वेष करणाऱ्यांसाठी तिची भावदशा धोकादायक आणि निर्दय असते कारण कोणत्याही लढाईपासून कच न खाणारी अशी ती, विश्वांची योद्धा आहे. महाकालीला दिव्यकार्यामध्ये अनास्था, निष्काळजीपणा आणि आळस खपत नाही आणि तसे करणाऱ्या व्यक्तीवर, म्हणजे वेळीअवेळी झोपणाऱ्या आणि विलंब करणाऱ्या व्यक्तीवर, गरज पडलीच तर ती तीव्र वेदनांच्या माध्यमातून एकाएकी आघात करते आणि अशा व्यक्तीला जागृत करते.

वेगवान, सरळ आणि प्रांजळ असे आवेग, निरपवाद आणि हातचे काहीही राखून न ठेवता झालेल्या गतिविधी, ज्वालेमध्ये आरोहण करणारी अभीप्सा या साऱ्या गोष्टी म्हणजे महाकालीची गती असते. तिचे चैतन्य दुर्दम्य असते; गरुडाच्या भरारीप्रमाणे तिची दृष्टी आणि तिचा संकल्प उच्चस्थानी आणि दूरवर पोहोचणारा असतो; ऊर्ध्वगामी मार्गावर तिची पावले वेगाने पडत असतात आणि प्रहार करण्यासाठी तसेच साहाय्य करण्यासाठी तिचे बाहू फैलावलेले असतात. कारण तीसुद्धा माताच आहे आणि जसा तिचा क्रोध तीव्र असतो तसेच तिचे प्रेमही उत्कट

असते. तिच्यापाशी एक अगाध आणि प्रचंड करुणा असते. तिच्या शक्तिसामर्थ्यानिशी तिला हस्तक्षेप करू दिला असता, विसंगत गोष्टी तसेच खीळ घालणारे अडथळे किंवा साधकावर हल्ला करणारे शत्रू या साऱ्यांचा ती क्षणार्धात पाडाव करते.

तिच्या विरोधकांसाठी तिचा संताप हा जरी भयावह असला आणि भित्र्या आणि दुर्बल व्यक्तींसाठी तिच्या दबावाची तीव्रता जरी क्लेशकारक असली, तरीही थोर, बलवान आणि महात्म्यांकडून मात्र तिची पूजा केली जाते आणि ते तिची भक्ती करतात; कारण त्यांची अशी धारणा असते की, त्यांच्या स्थूलद्रव्यामध्ये जे बंडखोर असे घटक असतात त्यांचा तिच्या (महाकालीच्या) आघातांमुळे पराजय होतो आणि त्या घटकांचे सामर्थ्यामध्ये व परिपूर्ण सत्यामध्ये परिवर्तन होते; जे कुचेष्टा करणारे व विकृत असते त्यावर ती सरळ घणाघाती आघात करते आणि जे अशुदध किंवा सदोष असते त्याला ती हद्दपार करते. तिला जे करायला एक दिवस लागला ते इतरांनी करायचे ठरविले तर त्याला शतकानुशतके लागली असती; तिच्याविना आनंद हा व्यापक, गभीर किंवा मृदू व मधुर आणि सुंदर असू शकतो पण सर्वाधिक उत्कटतेचा जो उसळणारा आनंद असतो तो मात्र तिच्याविना गमावला जाण्याची शक्यता असते.

ज्ञानाला ती विजयी प्रबलता प्रदान करते; सौंदर्य व सुसंवादास ती उच्च व ऊर्ध्वगती देऊ करते आणि परिपूर्णतेसाठी जे संथगतीने पण कठोर परिश्रम करत असतात त्यांना ती चालना देते, त्यामुळे त्यांची शक्ती बहुगुणित होते आणि लांबवरचा मार्ग हा जवळचा होतो. परमानंद, सर्वोच्च उंची, उदात्त ध्येये, अतिविशाल दृश्ये यांच्यापेक्षा जे काही उणे आहे त्याने तिचे समाधान होत नाही. त्यामुळे तिच्या सोबत ईश्वराची विजयी शक्ती असते आणि जी महान उपलब्धी प्राप्त करून घ्यायची आहे ती कालांतराने कधीतरी प्राप्त करून घेण्याऐवजी, तिच्या अग्नीच्या आणि आवेगाच्या आणि तिच्या वेगवानतेच्या कृपेमुळे ती अगदी

आत्तादेखील प्राप्त होऊ शकते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 19-20)

*

महाकालीच्या प्रतिमांपाठीमागील वास्तव

(श्रीमाताजींनी श्रीअरविंदलिखित The Mother या ग्रंथातील महाकालीवरचा एक उतारा वाचून दाखविला.)

प्रश्न : महाकालीच्या प्रतिमेविषयी ज्या गोष्टी सांगितल्या जातात त्या खऱ्या असतात का?

श्रीमाताजी : मला वाटते, मी मागे तुम्हाला एकदा सांगितले होते की, मूळ पुरुष हे त्यांच्या उच्चतर वास्तवामध्ये असतात. आणि ते एका विशिष्ट प्रकारचे असतात; ते जसजसे पृथ्वीच्या अधिकाधिक नजीक येऊ लागतात, अधिकाधिक भौतिक प्रांतांमध्ये आविष्कृत होऊ लागतात, तसतसे ते विविध रूपं धारण करतात आणि ते विलक्षण रीतीने वाढत राहतात. श्रीअरविंद इथे ज्या जिवांबद्दल बोलत आहेत ते अतिमानसाच्या जवळ असणाऱ्या प्रांतांमधील असतात, ते अजूनही बऱ्यापैकी त्यांच्या अतिमानसिक उगमाच्या स्पष्ट आणि जागृत संपर्कामध्ये असतात. श्रीअरविंद ज्याला 'अधिमानस' (Overmind) असे संबोधतात त्यामध्येही हे जीव आविष्कृत होतात आणि तिथे त्यांची रूपं ही अधिक स्पष्ट, काहीशी अधिक नेमकी असतात परंतु त्याच वेळी शक्ती आणि क्षमतेमध्ये मात्र ती उणी असतात. आणि मग या अधिमानसातून ती रूपं मानवी मनामध्ये, पार्थिव मनांमध्ये उतरतात आणि...

उदाहरणादाखल, बिचाऱ्या महाकालीचेच उदाहरण घेऊ; तुमच्याकडे तर बहुसंख्य काली असतात. एकापेक्षा दुसरी अधिक भयावह असते; काही काही तर फारच भीतीदायक आणि भयावह असतात. निव्वळ मानवी कल्पनांमधून साकारलेल्या त्या, कधीकधी तर अगदी घृणास्पद अशा बनतात; त्यांचे बाह्य रूप हे मानवी कल्पनेमधून, कल्पना

करण्याची क्षमता असणाऱ्या मानवी मनातून साकारलेले असते. त्यामध्ये महाकालीच्या शक्तीचे एक पुसटसे प्रतिबिंब असू शकते; पण ते इतके धूसर, इतके विरूपित, इतके खुजे असते, ते इतके मानवी चेतनेच्या श्रेणीत आणून बसविलेले असते की ते पाहून, ती महाकाली स्वतःच असे ठामपणे म्हणू शकेल की, 'ही मी नव्हे.' महाकालीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रतिमांमधून मी सर्व संभाव्य भयानकता पाहिल्या आहेत. जर कोण्या महान शिल्पकारांनी त्या मूर्ती घडविल्या असतील तर त्यामध्ये थोडेफार सौंदर्य शिल्लक राहिलेले असते; परंतु बहुतेक वेळा अकुशल मूर्तिकार असतात आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये काहीच सौंदर्य शिल्लक राहात नाही. मंदिरांमध्ये जेव्हा प्रतिमांची (मूर्ती किंवा चित्र) प्राणप्रतिष्ठा करायची असते तेव्हा तेथे एक धार्मिक विधी केला जातो आणि त्या पुजाऱ्याकडे किंवा त्याच्या साहाय्यकाकडे जर काही गूढ शक्ती असतील, अगदी मर्यादित का असेनात, पण त्याच्या आवाहनाद्वारे आणि धार्मिक विधींद्वारे, ते अति-पार्थिव चेतना या रूपांमध्ये उतरवू शकतात. हे तत्त्व आहे : तुम्हाला सांगण्यात येते की, ''हा केवळ लाकडी ओंडका नाही, ही पाषाणाची मूर्ती नाही, हे केवळ एक चित्र नाही; धार्मिक विधीच्या द्वारे यामध्ये शक्ती उतरविण्यात आली आहे आणि आता तुम्ही त्या शक्तीशी बोलू शकता.'' हे योग्य आहे, पण त्या पुजाऱ्याची प्रकृती, त्याचे गूढ ज्ञान आणि त्याला ज्या शक्तींविषयी आत्मीयता आहे, त्या साऱ्याची माहिती आपल्याला हवी. तेव्हा अशा अनेकानेक गोष्टी असतात... (हे धार्मिक विधी करणारा माणूस अगदीच अडाणी नसेल, त्याच्यापाशी कोणतीच शक्ती नसेल, त्याने त्या मूर्तीमध्ये काहीच उतरविले नसेल आणि नुसताच देखावा केलेला असेल - हे नेहमीच असे घडते असे काही मी म्हणत नाहीये, खरंच हे दुर्मिळ असते.) या मूर्तींमध्ये बहुधा काहीतरी असते, परंतु या कोणत्या तरी गोष्टीचे स्वरूप, त्याची गुणवत्ता... ही असंख्य प्रकारची असते आणि कधीकधी तर ती काहीशी अस्वस्थ

करणारी असते.

मी महाकालीचे उदाहरण दिले कारण मानवी जाणिवेमध्ये महाकालीची संकल्पना ही प्रामुख्याने भयानक अशी असते. व्यक्ती जेव्हा इतर देवदेवतांकडे जाते, उदा. महासरस्वती, की जिच्याकडे सर्व प्रकारच्या कला, साहित्य आणि इतर क्षमता असल्याचे सांगितले जाते, तिची संकल्पना मात्र तितकीशी भयावह नसते. पण खास करून महाकाली... तिची शक्ती, सामर्थ्य, तिची युद्धप्रिय ऊर्जा या साऱ्या गोष्टी माणसांच्या संकल्पनेत इतक्या भयावह असतात की, त्या संकल्पना जेव्हा ते प्रत्यक्षात आणतात तेव्हा त्या गोष्टी त्या मूर्तीची पूजा करणाऱ्या भक्तांसाठी काहीशा धोकादायक ठरतात.

भारतात आल्यापासून मी अशा असंख्य गोष्टी ऐकल्या आहेत. अशा असंख्य मूर्तींशी माझा संपर्क आला आहे आणि ज्यांच्या घरात कालीची पूजा केली जाते आणि ज्यांच्या बाबतीत काहीतरी भयानक गोष्टी घडलेल्या आहेत अशीही अनेक उदाहरणे मला माहीत आहेत. मी नेहमीच त्यांना सावध करत असते, मी त्यांना सांगते की, ''तुमच्या दुर्दैवाला 'महाकाली' कारणीभूत आहे असे समजू नका, कारण ती खरोखर तशी कारणीभूत नसते. तुमच्या घरामध्ये जी 'काली' आहे तिच्या माध्यमातून एखाद्या खुनशी जिवाचा आश्रय तिथे झालेला असू शकतो, कदाचित अतिशय मत्सरी, अत्यंत दुराग्रही आणि ज्याच्याकडे बदला घेण्याची तीव्र भावना आहे अशा एखाद्या जिवाला तिच्या माध्यमातून आश्रय मिळालेला असू शकतो आणि तुमची तिच्यावर श्रद्धा असल्याने आणि बहुधा ती प्राणिक शक्ती असल्याने अशा प्रकारचे खरोखर घातक परिणाम दिसून येतात.'' अशा प्रकारचे सगळे दुर्दैवी अनुभव आल्यानंतर ज्यांनी 'महाकाली'ची मूर्ती गंगेत सोडून दिली आहे, अशीही काही माणसं मला माहीत आहेत. पण जर का त्याचवेळी ते त्या भावनेपासून निश्चितपणाने सुटका करून घेऊ शकले असते तर, त्यांचे ते सारे नुकसान झाले नसते. पण त्यांनी हे जे

काही केलेले असते त्यामुळे, काहीजण इतके भयभीत झालेले असतात की त्यामुळे ते वाईट परिणाम तसेच कायम राहतात. गूढविद्येची थोडीतरी तोंडओळख असल्याखेरीज या गोष्टींमध्ये हात घालता कामा नये.

...पृथ्वीच्या वातावरणात खरोखरच एक 'काली' असते की जी भौतिक गोष्टी हाताळत असते आणि ती काहीशी स्वतंत्र असते असे म्हणता येणार नाही, पण ती 'महाकाली'ची अभिव्यक्तीदेखील नसते; परंतु ती तिचे सर्वस्वी आज्ञापालन करत असते आणि तिच्यामध्ये महाकालीचे महत्त्वाचे गुण असतात. त्यांची शक्ती आणि कार्यक्षमता कमी झालेली असते पण ते गुण अस्तित्वात असतात आणि महाकालीच्या प्रकृतीचे सौंदर्यही तेथे असते. व्यक्तीने केलेल्या दुष्कृत्याबद्दल त्याला ती स्वतःहून कधी शिक्षा करत नाही. तिची जे भक्ती करतात, त्यांना ती कधीही इजा करत नाही; जे देश तिच्याविषयी पुरेसा आदर करत नाहीत किंवा तिची कदर करत नाहीत, त्या देशांमध्ये साथीचे आजार देऊन ती त्यांच्यावर आघातसुद्धा करत नाही. परंतु तिला हिंसा आवडते, तिला युद्ध आवडते आणि तिचा न्याय निर्णायक असतो.

– श्रीमाताजी (CWM 04 : 395-397)

*

महाकालीचे मूळ अधिमानसात

प्रश्न : 'चंडी'मध्ये वर्णन करण्यात आलेले महाकालीचे रूप आणि तिचे श्याम रूप यांच्यामध्ये कोणता मूलभूत फरक आहे?

श्रीअरविंद : काली, श्यामा इ. ही जी सर्वसामान्य रूपं आहेत ती प्राणाच्या माध्यमातून दिसून येतात; खऱ्या महाकालीचे रूप, जिचे मूळ हे अधिमानसात असते, ते कृष्णवर्णी किंवा काळे किंवा भयावह नाही, अगदी असुरांना जरी तिचे रूप भयावह वाटले तरीसुद्धा, ती सुवर्णमयी आणि सौंदर्यवान असते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 68)

*

महाकालीच्या आघाताचे स्वरूप

प्रश्न : महाकालीच्या आघाताचे स्वरूप कसे असते?

श्रीमाताजी : त्या आघाताने तुम्हाला खूप आनंद होतो. त्यामुळे तुम्हाला तुमच्या हृदयामध्ये एक गोडशी ऊब जाणवते. तुम्हाला समाधानी झाल्यासारखे वाटते.

प्रश्न : व्यक्तीने त्याची आस बाळगली पाहिजे की ते आपोआपच घडते?

श्रीमाताजी : हो, व्यक्तीला प्रगती करण्याची खरोखरच इच्छा असली पाहिजे, त्या इच्छेमध्ये प्रामाणिकता असली पाहिजे. व्यक्तीने खरोखर अगदी प्रामाणिकपणे असे म्हटले पाहिजे की, ''हो, मला प्रगती करायची आहे'', ''काहीही झाले तरी मला प्रगती करायची आहे.'' आणि मग तो आघात होतो. परंतु मी म्हटले त्याप्रमाणे, ज्यामध्ये उत्कट आनंदाची धारणा असते अशा समृद्धीच्या शक्तीसहित तो आघात येतो. व्यक्तीने एकदा निर्णय घेतला असेल, तिने स्वतःमधील काहीतरी थांबविण्याचा निश्चय केला असेल, तिने जी चूक एकदा केली होती तीच पुन्हा न करण्याचा निश्चय केला असेल किंवा करायला अवघड वा अशक्यप्राय आहे आणि तरीही करण्याजोगी आहे अशी कोणतीतरी गोष्ट करण्याचा निर्णय तिने घेतला असेल आणि व्यक्तीने असा निर्णय घेऊन, स्वतःच्या इच्छेवर पूर्ण प्रामाणिकता ठेवली असेल आणि अशा वेळी तुम्ही जे करायचे ठरविले होते तेच करण्यास भाग पाडण्यासाठी जर का प्रचंड आघात तुमच्यावर झाला, तर तो आघातच असतो पण तुम्हाला तुमचा गौरव झाल्यासारखे वाटते, तुम्ही आनंदी होता, तुम्हाला हृदयामध्ये काहीतरी भव्योदात्त असे वाटू लागते.

निव्वळ बाह्यवर्ती, यांत्रिक, भौतिक जाणिवेमध्ये जगत असताना आणि अज्ञानदशेमध्ये असताना ज्या सर्व संभाव्य चुका तुम्ही करता त्याचे स्वाभाविक परिणाम म्हणून अटळपणे, ज्या अघटित गोष्टी घडून येतात

त्यामध्ये आणि तुम्ही स्वतःवर प्रभुत्व मिळविण्याचा निश्चय केल्यानंतर, तुम्ही ज्या उच्चतर अवस्थेत उन्नत होता, आणि काहीही झाले तरी, सत्याच्या चेतनेमध्येच जीवन व्यतीत करायचा निर्धार तुम्ही केलेला असतो, प्रगतीसाठी कोणतीही किंमत मोजावी लागली तरी चालेल पण प्रगती करायचीच, असे तुम्ही ठरविलेले असते त्या उच्चतर अवस्थेमध्ये खूप मोठा फरक पडतो. अशा वेळी तुमच्या बाबतीत ज्या घटना घडतात त्या इतक्या अर्थपूर्ण असतात की, तुम्हाला त्यामध्ये झळाळणारे सत्य स्पष्टपणे दिसून येते; जणू काही तुम्हाला दीपस्तंभ लाभावा त्याप्रमाणे तुमचा मार्ग उजळवून टाकणारा प्रकाश तुम्हाला दिसतो, तो प्रकाश तुम्हाला मार्गदर्शन करतो, आणि हे सारे तुम्हाला स्पष्टपणे दिसून येते. तुमच्या पाठीवर एखादा धोंडा येऊन कोसळावा त्याप्रमाणे तो आघात तुमचा विनाश करणारा नसतो. त्यामध्ये उत्कट दीप्तिमानता असते. आणि म्हणूनच असे म्हटले जाते की, पहिल्या पायरीवरच फक्त प्रयत्नांची आवश्यकता असते. येथे पहिली पायरी म्हणजे त्या पातळीवरून बाहेर पडून या वरील पायरीवर चढून येणे. आणि मग नंतर सारे, सारे काही बदलून जाते. परंतु व्यक्तीने त्या पातळीवरून पूर्णतः बाहेर पडले पाहिजे, तिने तिथेच राहाता कामा नये, व्यक्तीने एक पाऊल तिकडे आणि एक पाऊल इकडे असे करता कामा नये, कारण मग तसे घडणार नाही.

– श्रीमाताजी (CWM 06 : 325-326)

**

हे विश्व नि:संशयपणे 'जडद्रव्या'वर आधारलेले आहे असे दिसते, पण 'चैतन्य' हे त्याचे शिखर आहे आणि 'चैतन्या'प्रत आरोहण हेच त्याच्या अस्तित्वाचे उद्दिष्ट आणि समर्थन असले पाहिजे आणि तेच त्याच्या अर्थाचे आणि प्रयोजनाचे निर्देशक असले पाहिजे.

– श्रीअरविंद (CWSA 13 : 581)

*

महालक्ष्मी

सुसंवाद आणि सौंदर्य

परम मातेची 'प्रज्ञा' आणि 'शक्ती' ही दोनच आविष्करणे आहेत असे नाही; तिच्या प्रकृतीचे अजूनही एक सूक्ष्म रहस्य आहे आणि त्याविना प्रज्ञा आणि शक्ती या गोष्टी अपूर्ण ठरतील आणि त्याविना पूर्णता ही सुद्धा परिपूर्ण होणार नाही.

त्यांच्या ऊर्ध्वदिशेस एक शाश्वत सौंदर्याचा चमत्कार असतो; दिव्य सुसंवादांचे एक अनाकलनीय असे रहस्य असते; प्रतिकार करता येणार नाही अशा वैश्विक मोहकतेची आणि आकर्षकतेची संमोहक जादू ही वस्तुंचे, शक्तींचे आणि जीवांचे लक्ष वेधून घेते आणि त्यांना एकत्र बांधून ठेवते आणि एका निगूढ आनंदाला पडद्यामागून क्रीडा करता यावी तसेच वस्तुंच्या, शक्तींच्या आणि जिवांच्या माध्यमातून त्या आनंदाचे ताल आणि त्या आनंदाच्या आकृत्या बनवाव्या म्हणून त्यांना (त्या वस्तुंना, शक्तींना आणि जिवांना) एकत्र येण्यासाठी आणि परस्परांना भेटण्यासाठी ती भाग पाडते. हे महालक्ष्मीचे सामर्थ्य असते. आणि याच्याइतका, दिव्य शक्तीचा अन्य कोणताही पैलू देहधारी जिवांसाठी अधिक आकर्षक नसतो.

पार्थिव प्रकृतीच्या क्षुद्रतेला 'महेश्वरी' ही इतकी शांत, इतकी महान आणि इतकी दूरस्थ भासते की, तिच्यापर्यंत पोहोचणे किंवा तिला धारण करणे हे त्यांना अवघड वाटू शकते; 'महाकाली'ची वेगवानता आणि तिची दुर्जेयता सहन करणे हे त्यांना त्यांच्या दुर्बलतेमुळे अवघड जाते; पण 'महालक्ष्मी'ची मात्र सर्वजण अभिलाषा बाळगतात आणि तिला आनंदाने भेटतात. त्यासाठी ती ईश्वरी माधुर्याचे मोहमयी मायाजाल फेकते. तिच्या सन्निध असणे हा एक परम आनंद असतो आणि तिचे सान्निध्य हृदयांतरी जाणवणे म्हणजे अस्तित्व उत्साहाने आणि अद्‌भुततेने भरून जाणे असते; सूर्यापासून प्रकाश प्रस्फुरित व्हावा त्याप्रमाणे ईश्वरी कृपा, मोहकता आणि हळूवारपणा या गोष्टी तिच्यामधून प्रस्फुरित होत असतात. ज्या कोणाकडे

तिची विस्मयकारक दृष्टी स्थिरावते किंवा ज्या कोणाकडे पाहून ती मधुर स्मित करते, त्याने जीव भारून जातो आणि बांधला जातो आणि तो अगाध आनंदाच्या गहराईमध्ये निमग्न होतो. तिचा हस्तस्पर्श आकर्षक असतो आणि तिचा अदृश्य व सूक्ष्म प्रभाव मन, प्राण आणि शरीर यांचे शुद्धीकरण करतो. महालक्ष्मी जिथे जिथे तिचे पाऊल ठेवते तिथे मनोहर आनंदाचे अद्‌भुत प्रवाह वाहू लागतात.

आणि तरीसुद्धा या चित्ताकर्षक शक्तीच्या अपेक्षा पूर्ण करणे किंवा तिचे सान्निध्य टिकवून ठेवणे, हे सोपे नसते. मनाचा आणि आत्म्याचा सुमेळ आणि सौंदर्य, विचार आणि भावना यांच्यामध्ये सुसंवाद आणि सौंदर्य, प्रत्येक बाह्य कृतीमध्ये आणि हालचालीमध्ये सुमेळ आणि सौंदर्य, जीवन आणि त्याच्या अवतीभोवतीचा परिसर यांच्यामध्ये सुमेळ आणि सौंदर्य, ही 'महालक्ष्मी'ची आवश्यकता असते. जिथे गुप्त विश्व–आनंदाच्या तालांविषयी आत्मीयता असते आणि जिथे ऐक्य, संवाद आणि सर्वांग–सुंदरतेच्या हाकेला प्रतिसाद मिळतो आणि जिथे अनेकांची जीवने ईश्वराभिमुख झाल्याचा आनंद–प्रवाह असतो, अशा वातावरणामध्ये ती वसती करण्यास तयार होते.

पण ज्या ज्या गोष्टी गलिच्छ, क्षुद्र आणि अधम आहेत, ज्या गोष्टी दरिद्री, स्वार्थांध आणि हिडीस आहेत, ज्या गोष्टी पाशवी आणि असभ्य आहेत, त्या साऱ्यांमुळे तिच्या आगमनाला अटकाव होतो. जेथे प्रेम आणि सौंदर्य नसते किंवा ते उदयास येण्यास अनुत्सुक असते तेथे महालक्ष्मी येत नाही; जिथे प्रेम आणि सौंदर्य यांची अधम गोष्टींसोबत सरमिसळ झालेली असते आणि त्या विरूप झालेल्या असतात, अशा ठिकाणापासून निघून जाण्यासाठी ती लगोलग माघारी वळते किंवा तिथे तिची समृद्धी प्रदान करण्याची तिची फारशी इच्छा नसते. जिथे माणसांची हृदयं स्वार्थीपणाने, द्वेषाने, मत्सराने, दुर्बुद्धीने, ईर्षेने, कलहाने घेरलेली आहेत; पवित्र यज्ञपात्रामध्ये जिथे फितुरी, लोभ, कृतघ्नता या गोष्टी मिसळलेल्या

आहेत; जिथे असंस्कारित इच्छा आणि आवेगांच्या प्रचुरतेमुळे भक्तीचे अवमूल्यन झालेले आहे, अशा ठिकाणी आपण आहोत असे जर तिला आढळले तर अशा हृदयांमध्ये ती कृपाळू आणि सुंदर देवता थांबणार नाही. दिव्य विरक्तीने ती भारली जाते आणि मग ती मागे फिरते कारण ती आग्रह धरणारी किंवा धडपड करणारी नसते; उपरोक्त कडवट व विषारी सैतानी साहित्य नाकारले जावे; नाहीसे व्हावे आणि पुन्हा एकदा तिचा आनंदी प्रभाव निर्माण झालेला दिसावा यासाठी, स्वतःचा चेहरा झाकून थांबून राहणारीही ती नसते. संन्यासी शुष्कपणा आणि कठोरता या गोष्टी तिला भावत नाहीत किंवा हृदयातील तीव्र भावनांचे दमन आणि आत्म्याच्या व जीवनाच्या सौंदर्यपूर्ण घटकांचे कठोर नियमन या गोष्टीही तिला भावत नाहीत. कारण प्रेम आणि सौंदर्य यांच्या माध्यमातूनच ती माणसांना ईश्वराधीन करते.

महालक्ष्मीच्या परमनिर्मितीमध्ये जीवन एका समृद्ध स्वर्गीय कलाकृतीमध्ये आणि सारे अस्तित्वच एका विशुद्ध आनंदाच्या काव्यामध्ये परिवर्तित झाले आहे; विश्वाची सारी संपदा एकत्रित केली जाते आणि एका परम सुव्यवस्थेसाठी तिचा सुमेळ घातलेला असतो आणि अगदी साध्याशा व सर्वसामान्य गोष्टीसुद्धा तिच्या एकात्मतेच्या अंतर्ज्ञानामुळे आणि तिच्या चैतन्याच्या निःश्वसितामुळे अद्‌भुत होऊन जातात.

एकदा का तिचा हृदयात प्रवेश झाला की, ती प्रज्ञेला अद्‌भुततेच्या शिखरावर उचलून घेते आणि सर्व ज्ञानातीत ब्रह्मानंदाची गूढ रहस्यं ती प्रकट करते; ती ईश्वराबद्दलच्या उत्कट आकर्षणाशी भक्तीचा संयोग घडविते; शक्तीच्या आणि सामर्थ्याच्या कृतींची प्रबलता प्रमाणशीर व सुसंवादी राहावी म्हणून, ती शक्तीला आणि सामर्थ्याला तालबद्धतेची शिकवण देते आणि परिपूर्णता चिरस्थायी व्हावी म्हणून तिच्यावर ती एक प्रकारची मोहिनी घालते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 20-22)

*

दिव्य मातेचे प्रेम

श्रीमाताजी : ‘महालक्ष्मी’ म्हणजे ‘दिव्य माते’च्या प्रेमाचा पैलू आहे, महालक्ष्मी म्हणजे आविष्कृत प्रेमाचे परिपूर्णत्व आहे. असे आविष्कृत प्रेमाचे पूर्णत्व आले तरच ‘व्यक्तते’च्या आणि ‘अव्यक्तते’च्याही अतीत असणारे परम ‘प्रेम’ अभिव्यक्त होऊ शकते...

‘परमेश्वरा’चे आविष्करण, ‘त्याच्या विजया’चे आविष्करण ग्रहण करण्यासाठी, पृथ्वीची तयारी करण्यासाठी ते आवश्यक असते. अशा रीतीने पाहिले असता, सारे सुस्पष्ट होते, आकलनसुलभ होते आणि सर्वसमावेशकसुद्धा होते. यामध्येच सार सामावलेले आहे.

– श्रीमाताजी (The Mother : Conversation with a disciple, May 11, 1963)

*

महालक्ष्मीचे प्रेमाकर्षण

प्रश्न : ‘‘ही महालक्ष्मीची शक्ती असते. आणि त्या एवढा, दिव्य शक्तीचा इतर कोणताही पैलू देहधारी जिवांसाठी अधिक आकर्षक नसतो,’’ असे श्रीअरविंदांनी लिहिले आहे. याचा अर्थ मला समजला नाहीये.

श्रीमाताजी : म्हणजे माणसांसाठी. पृथ्वीवरील मनुष्यमात्रांसाठी, पृथ्वीवरील जिवांसाठी असे म्हणण्याची ही दुसरी पद्धत आहे. ...यामध्ये प्राणिमात्रांचाही समावेश होतो.

महालक्ष्मी ही प्राणिमात्रांबाबत अतिशय प्रेमळ असते आणि प्राणीसुद्धा तिच्यावर खूप प्रेम करतात. अगदी क्रुद्ध असणारे प्राणीसुद्धा तिच्याजवळ आल्यावर अगदी सौम्य बनतात आणि म्हणूनच येथे ‘मनुष्यमात्र’ असा शब्दप्रयोग करण्याऐवजी, श्रीअरविंदांनी येथे ‘देहधारी जीव’ म्हणजे पृथ्वीवर जे जीव देहासहित असतात, असा उल्लेख केला आहे.

– श्रीमाताजी (CWM 06 : 282)

*

महालक्ष्मीची आवश्यकता

(श्रीमाताजींनी श्रीअरविंद लिखित The Mother या ग्रंथातील पुढील भाग वाचून दाखविला.) मनाचा आणि आत्म्याचा सुमेळ आणि सौंदर्य, विचार आणि भावना यांच्यामध्ये सुसंवाद आणि सौंदर्य, प्रत्येक बाह्य कृतीमध्ये आणि हालचालीमध्ये सुमेळ आणि सौंदर्य, जीवन आणि त्याच्या अवतीभोवतीचा परिसर यांच्यामध्ये सुमेळ आणि सौंदर्य, ही 'महालक्ष्मी'ची आवश्यकता असते. (वाचून झाल्यावर श्रीमाताजींनी त्याचे स्पष्टीकरण केले आहे.)

जेव्हा सभोवताल, परिस्थिती, वातावरण, जीवनसरणी आणि सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे आंतरिक दृष्टिकोन हा अधम, असभ्य, असंस्कृत, अहंकारी, नीच असेल तर तेथे प्रेम येण्यास नाखूष असते, ते स्वतःचा आविष्कार करण्यास नेहमीच काचकूच करते आणि सहसा ते तेथे जास्त काळ टिकून राहत नाही. 'सौंदर्या'ला राहण्यासाठी आपण त्याला सौंदर्यपूर्ण घर दिले पाहिजे. मी कोणत्याही बाह्य गोष्टींविषयी बोलत नाहीये – म्हणजे खरेखुरे घर, खरेखुरे फर्निचर आणि तत्सम गोष्टींविषयी बोलत नाहीये – तर मी आंतरिक दृष्टिकोनाबाबत बोलत आहे, तो सुंदर, उदात्त, सुसंवादी, निःस्वार्थी असा असला पाहिजे. तिथे प्रेमाला येण्याची आणि राहाण्याची संधी असते. पण ते आविष्कृत होण्याच्या प्रयत्नात असताना जर का, ते लगेचच नीच आणि कुरुप गोष्टींबरोबर मिसळले गेले, तर मग ते तेथे राहत नाही, ते तिथून निघून जाते. यालाच श्रीअरविंदांनी 'उदयाला येण्यास अनुत्सुक' असे म्हणले आहे. – म्हणजे त्याला उदयाला आल्याबरोबर लगेचच पश्चात्ताप होतो. माणसं नेहमीच, 'त्यांच्यापाशी प्रेम टिकून राहत नाही', अशी तक्रार करत असतात पण तो पूर्णतः त्यांचाच दोष असतो. माणसं त्या प्रेमाला इतके अधम जीवन, भीतीदायक गोष्टी आणि इतकी असभ्यता, अगदीच नीच, इतक्या स्वार्थी, इतक्या घाणेरड्या गोष्टी देऊ करतात की, त्या साऱ्या सोबत ते बिचारे

प्रेम राहू शकत नाही. जर माणसं या साऱ्या गोष्टींचा समूळ नाश करू शकली नाहीत तर ती या प्रेमाला सर्वथा दुर्बल बनवितात. त्यामुळे तेथून पलायन करायचे एवढी एकच गोष्ट त्या प्रेमाच्या हाती शिल्लक राहते. प्रेम अस्थायी असते, निघून जाणारे असते अशी तक्रार लोकं नेहमीच करत असतात. सत्य सांगायचे झाले तर, लोकांनी देऊ केलेल्या गलिच्छ घरामध्येसुद्धा ते प्रेम आविष्कृत झाले म्हणून त्यांनी खरे तर त्याचे कृतज्ञ असले पाहिजे.

– श्रीमाताजी (CWM 04 : 402)

*

महालक्ष्मीच्या आगमनाला अटकाव करणाऱ्या गोष्टी

प्रश्न : इथे श्रीअरविंदांनी महालक्ष्मीविषयी असे म्हटले आहे की,''ज्या ज्या गोष्टी दारिद्र्युक्त आहेत... त्या साऱ्या गोष्टी ह्या महालक्ष्मीच्या आगमनाला अटकाव करतात.''

श्रीमाताजी : हो, गरीब, औदार्यरहित, तेजहीन, वैपुल्यविहीन, आंतरिक श्रीमंतीविना असलेले जे जे काही शुष्क, थंड, संकुचित असे असते ते महालक्ष्मीच्या आगमनाला अटकाव करते. लक्षात घ्या की, हा काही पुष्कळ पैसा असण्याचा किंवा नसण्याचा प्रश्न नाही. अत्यंत सधन व्यक्तीसुद्धा महालक्ष्मीच्या दृष्टिकोनातून पाहता अतिशय दरिद्री असू शकते. आणि तेच एखादा गरीब माणूस, जर त्याचे हृदय उदार असेल तर तो अत्यंत वैभवसंपन्न असू शकतो.

प्रश्न : जेव्हा आपण 'गरीब माणूस' असे म्हणतो, तेव्हा त्याचा नक्की अर्थ काय असतो?

श्रीमाताजी : ज्याच्यापाशी गुण नाहीत, शक्ती नाही, सामर्थ्य नाही, औदार्य नाही असा माणूस दरिद्री होय. असा माणूस हा दु:खीकष्टी, असमाधानी असतो. खरंतर, जेव्हा व्यक्ती उदार नसते तेव्हाच ती असमाधानी असते – जर एखाद्याची प्रकृती उदार असेल, कोणतीही

मोजदाद न करता व्यक्ती दान करत असेल तर, अशी व्यक्ती कधीच दु:खी असणार नाही. जे स्वत:ला संकुचित करून घेतात आणि जे सतत सर्व गोष्टी स्वतःकडेच खेचू इच्छितात, जे फक्त स्वत:च्याच चष्म्यातून सर्व गोष्टींकडे आणि जगाकडे पाहतात, असे लोक दु:खी असतात. पण जेव्हा व्यक्ती कोणतीही गणती न ठेवता, मोजदाद न करता, उदारतेने स्वत:ला देऊ करते, तेव्हा ती कधीच दु:खी राहणार नाही. जो घेऊ इच्छित असतो तो दु:खी असतो पण जो देऊ इच्छित असतो तो कधीच दु:खी असत नाही.

– श्रीमाताजी (CWM 04 : 403-404)

**

राधेची प्रार्थना

...ज्यांना पाहता क्षणीच, ते माझ्या अस्तित्वाचे प्रभू आणि माझे ईश्वर आहेत असे मी ओळखले, ते तुम्ही, माझी अर्चना स्वीकार करा.

तुमचेच आहेत माझे सर्व विचार, माझ्या सर्व भावना, माझ्या हृदयाच्या सर्व संवेदना, माझ्या सर्व संवेदना, माझ्या जीवनातील सर्व गतिविधी! माझ्या शरीरातील प्रत्येक पेशी न् पेशी आणि माझ्या रक्ताचा थेंब न् थेंब तुमचाच आहे. मी पूर्णतया आणि सर्वांगाने तुमचीच आहे, काहीही हातचे राखून न ठेवता केवळ तुमचीच आहे. मी जे व्हावे अशी तुम्ही इच्छा कराल, तशी मी होईन.

तुम्ही माझ्यासाठी जीवन किंवा मृत्यू, आनंद वा दु:ख, सुख वा वेदना, ज्या कशाची निवड कराल, ते तुमच्याकडून आलेले असल्याने मी त्याचे स्वागतच करेन. तुमच्याकडून भेटीदाखल आलेली प्रत्येक गोष्ट ही नेहमीच माझ्यासाठी परमानंद प्रदान करणारी दिव्य भेटवस्तूच असेल.

(श्रीमाताजींनी ही प्रार्थना मुळात इंग्रजीत लिहिली आणि दुसऱ्या दिवशी ती फ्रेंचमध्ये अनुवादित केली. नंतर श्रीअरविंदांनी फ्रेंच आवृत्तीचा पुन्हा इंग्रजीत अनुवाद केला. वर त्याचाच मराठी अनुवाद देण्यात आला आहे.)

– श्रीमाताजी (CWM 15 : 210)

*

महासरस्वती

कार्यकारी शक्ती

दिव्य मातेची कार्यकारी शक्ती आणि पूर्णतेचा व सुव्यवस्थेचा भाव म्हणजे 'महासरस्वती'. चौघींमधील सर्वात लहान असणारी ती, तिच्या कार्यकारी क्षमतेबाबत सर्वात कुशल आहे आणि जडभौतिक प्रकृतीच्या ती सर्वात निकट असते... विश्वशक्तींच्या कार्याची स्थूलमानाने आखणी 'महेश्वरी'द्वारे केली जाते; त्यासाठी लागणारी ऊर्जा आणि चालना 'महाकाली' देते; 'महालक्ष्मी' त्यांचे प्रमाण आणि ताल शोधून काढते; परंतु 'महासरस्वती' त्यांच्या अंमलबजावणीचे आणि त्यांच्या सुसंघटनेचे बारकावे पाहते; त्यांच्या भागांमधील परस्पर नातेसंबंध, शक्तींचे परिणामकारक संयोजन व परिणाम आणि परिपूर्तीच्या बिनचूक यथातथ्यतेच्या ती अध्यक्षस्थानी असते. विज्ञान आणि कला, वस्तुंचे तंत्र या सगळ्या गोष्टींचा 'महासरस्वती'च्या प्रांतामध्ये समावेश होतो. ती नेहमीच स्वतःमध्ये प्रकृतीला सामावून घेत असते आणि तिने ज्यांची निवड केलेली असते त्यांना ती अगदी हृदयस्थ व नेमके ज्ञान, सूक्ष्मता आणि धैर्य, अंतर्ज्ञानी मनाची अचूकता आणि जागृत हात व परिपूर्ण कार्यकर्त्याची भेदक नजर देऊ शकते. ही शक्ती बलशाली असते, न थकणारी असते, ती सतर्क आणि तत्पर रचनाकार असते, ती सुव्यव्यस्था लावणारी असते, ती प्रशासक असते, ती तंत्रज्ञ, कलाकार असते आणि ती विश्वांचे वर्गीकरण करणारी असते.

जेव्हा ती रूपांतरणाचे आणि प्रकृतीच्या नव्या घडणीचे काम हाती घेते, तेव्हा तिचे ते कार्य परिश्रमपूर्वक आणि तपशीलवारपणे चालू असते आणि आपल्या अधीरतेला ते बऱ्याचदा मंद आणि कधीच न संपणारे असे वाटते; पण ते कार्य दीर्घकाळ चालणारे, सर्वांगीण आणि दोषरहित असते. तिचा तिच्या कार्याबाबत असणारा संकल्प अत्यंत चोख असतो, सजग असतो आणि अथक असतो; आपल्यावर ती लक्ष ठेवून असते

आणि अगदी बारीक तपशीलांचीदेखील ती नोंद घेत असते; त्यांना स्पर्श करत असते; अगदी बारीक दोष, काही फट असेल तर ती फट, काही वाकुडेपण असेल तर ते वाकुडेपण किंवा काही अपूर्णता असेल तर ती अपूर्णता 'महासरस्वती' शोधून काढते आणि आजवर केलेल्या कार्याचे आणि येथून पुढे जे कार्य करायचे बाकी आहे ते सारे ती विचारात घेते आणि त्याचे ती अचूक मोजमाप करते. तिच्या दृष्टीला कोणतीच गोष्ट अगदी लहान किंवा वरकरणी क्षुल्लक असत नाही; गोष्ट कितीही दुर्बोध असू दे, प्रछन्न (disguised) असू दे किंवा सुप्त असू दे, 'महासरस्वती'पासून काहीही लपून राहत नाही. प्रत्येक घटकाला जोवर त्याचे त्याचे खरे रूप प्राप्त होत नाही तोपर्यंत त्याची घडण, त्याची पुनर्घडण करत नेणे आणि प्रत्येक घटक समग्रतेच्या दृष्टीने विचारात घेऊन त्याच्या त्याच्या योग्य स्थानी ठेवणे आणि त्याचे नेमके हेतू पूर्णत्वाला नेणे, यासाठी ती परिश्रम करत असते. तिने वस्तुंच्या नित्य व परिश्रमपूर्वक केलेल्या व्यवस्थेमधील आणि पुनर्व्यवस्थेमधील, सर्व गरजांकडे एकाच वेळी तिची दृष्टी असते आणि त्या गरजा कोणत्या मार्गाने पूर्ण करायच्या याकडेही तिची दृष्टी असते. काय स्वीकारायचे आणि कशाला नकार द्यायचा हे तिच्या अंतर्ज्ञानाला ज्ञात असते आणि त्यामुळे ती यशस्वीपणे सुयोग्य साधन, सुयोग्य वेळ, सुयोग्य परिस्थिती आणि सुयोग्य प्रक्रिया यांचे निर्धारण करत असते.

निष्काळजीपणा, दुर्लक्ष आणि आळस या गोष्टींचा तिला तिटकारा असतो. गडबडघोटाळे केलेले, घाईघाईने कसेतरी केलेले काम, अस्ताव्यस्तपणे केलेले काम, कसेही केलेले काम, बेडौल आणि विसंगती, सर्व खोटे अनुकरण आणि साधने व क्षमतांचा गैरवापर आणि गोष्टी अर्धवटपणे किंवा काही न करताच सोडून देणे या साऱ्या गोष्टी तिच्या दृष्टीने अवमानकारक असतात; तिच्या प्रवृत्तीला परकीय असतात. जेव्हा तिच्या कार्याची सांगता झालेली असते तेव्हा कोणतीच गोष्ट राहून गेलेली

नसते, कोणताच घटक अस्थानी नसतो किंवा वगळण्यात आलेला नसतो किंवा दोषपूर्ण स्थितीत तसाच सोडून देण्यात आलेला नसतो; सारे काही ठोस, अचूक, परिपूर्ण आणि स्तुत्य असते. परिपूर्ण पूर्णत्वामध्ये कोणतीही कमतरता असेल तर त्याने तिचे समाधान होत नाही आणि तिच्या निर्मितीच्या परिपूर्णतेसाठी जर आवश्यकता भासलीच तर ती अनंतकाळ परिश्रम करण्यास सिद्ध असते. त्यामुळेच दिव्य मातेच्या सर्व शक्तींपैकी 'महासरस्वती' ही माणसाच्या बरोबरीने सर्वाधिक दीर्घकाळ कष्ट सोसत आलेली आहे आणि त्याच्या हजारो कमतरतादेखील सहन करत आलेली आहे.

दयाळु, हसतमुख, निकट आणि साहाय्यकारी असणारी, सहजी विन्मुख किंवा निराश न होणारी, पुन्हापुन्हा अपयश आले तरीदेखील अडिग राहणारी अशी ही महासरस्वती, जर आपला संकल्प एककेंद्री असेल, सरळमार्गी आणि प्रामाणिक असेल तर प्रत्येक पावलागणिक तिचा कृपाहस्त आपला सांभाळ करत असतो; द्विधा मनःस्थिती तिला खपत नाही आणि नाटकीपणा, आत्मवंचना आणि ढोंग याबाबत ती निर्दय असल्याचे तिच्या उपरोधातून प्रकट होते. आपल्या गरजेच्या वेळी मातारूपाने धावून येणारी, आपल्या अडीअडचणींच्या वेळी आपली सुहृद बनणारी, चिकाटी बाळगणारी आणि शांत अशी समुपदेशक आणि मार्गदर्शक असणारी, मळभ, वितुष्ट आणि नैराश्याचे ढग आपल्या देदीप्यमान हास्याने पळवून लावणारी, अशी ती आपल्याला तिच्या सदातत्पर साहाय्याची आठवण करून देत असते; ती शाश्वत सूर्यप्रकाशाकडे निर्देश करत असते; ती दृढ, शांत असते आणि उच्चतर प्रकृतीच्या समग्रतेकडे आपल्याला घेऊन जाणारी जी सातत्यपूर्ण आणि गहन अशी प्रेरणा असते त्याबाबत चिकाटी बाळगणारी असते.

इतर 'शक्तीं'चे कार्य त्यांच्या पूर्णत्वासाठी तिच्यापुढे लीन झालेले असते; कारण ती भौतिक आधार पुरविते, तपशीलवार गोष्टींचे विस्तृत

वर्णन करते आणि ती रचनेचे कवच उभे करते, घडविते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 22-23)

*

प्रतिमांची यथातथ्यता

प्रश्न : 'महासरस्वती'च्या ज्या प्रतिमा आम्ही पाहतो त्या खऱ्या आहेत का?

श्रीमाताजी : अरे देवा! जेव्हा एखादे छोटे बालक एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र काढायचा प्रयत्न करते, तेव्हा ते त्या व्यक्तीशी मिळतेजुळते असते का? हे अगदी तसेच असते, बऱ्याचदा त्यापेक्षाही वाईट! कारण बालक हे निर्मळ असते, प्रामाणिक असते, मात्र जी व्यक्ती देवदेवतांच्या मूर्ती तयार करते त्या व्यक्तीमध्ये तिची स्वतःची मतं दृढमूल झालेली असतात, तिच्या स्वतःच्या अशा काही पूर्वग्रहयुक्त कल्पना असतात, किंवा अगदीच तसे नसेल तर इतर लोकांनी त्या विषयाबाबतीत काहीतरी सांगितलेले असते किंवा धर्मग्रंथांमध्ये काहीतरी लिहिलेले असते, शिवाय लोकांनी जे काही पाहिलेले असते त्या गोष्टी असतातच. आणि मग ती व्यक्ती (मूर्तिकार) या साऱ्याने बद्ध झालेली असते. कधीकधी ज्यांच्याकडे काही आंतरिक दृष्टी आहे, उत्कट अभीप्सा आहे, किंवा आत्म्याची आणि दृष्टीची विशुद्धता आहे, असेही काही कलाकार वेळोवेळी आढळून येतात; त्यांनी निर्मिलेल्या गोष्टी या बऱ्यापैकी चांगल्या असतात. पण हे फारच दुर्मिळ असते. सर्वसाधारणपणे, विरुद्धच गोष्टी आढळून येतात, असे माझे मत आहे.

त्यातील काही रूपं मी प्राणिक आणि मानसिक जगतामध्ये पाहिलेली आहेत, जी खरंतर मानवनिर्मित होती. त्यांच्या माध्यमातून पलीकडील शक्ती आविष्कृत होत असते. परंतु खरोखरच या मिथ्यत्वाच्या त्रिविध जगतांमध्ये मनुष्याने कमीअधिक प्रमाणात स्वतःच्या रूपाप्रमाणे देवाची निर्मिती केली आहे. मानवाच्या रचनात्मक विचारांच्या परिणामस्वरूप

बनलेल्या रूपांच्या माध्यमातून आविष्कृत होणारे असे काही जीवही असतात. मी असे काही जीव पाहिलेले आहेत... आणि हे सारे इतके काही धूसर आहे, अनाकलनीय आहे, की ते शब्दात मांडता येणार नाही...

काही देवदेवतांना इतर देवतांच्या तुलनेत वाईट वागणूक मिळते. उदाहरणार्थ, बिचारी महाकाली, तिच्याबाबतीत लोकांनी काय काय गोष्टी केल्या आहेत... त्या गोष्टी इतक्या भयावह आणि अकल्पनीय आहेत! पण ही रूपं केवळ अगदी निम्न विश्वामध्येच निवास करतात... हो. अगदी कनिष्ठ प्राणिक विश्वामध्ये. आणि त्यांच्यामध्ये त्यांच्या मूळ रूपाचे जे प्रतिबिंब असते ते त्या मूळ रूपापासून इतके दूरस्थ असते की ते जवळ जवळ ओळखण्यापलीकडचे असते. असे असले तरीही, मानवी चेतनेला मात्र याच गोष्टींनी भुरळ पाडलेली असते.

आणि जेव्हा एखादी मूर्ती घडविली जाते तेव्हा एखादा पुजारी ती मूर्ती आणतो – जेव्हा तो सारा पूजाविधी विधिवत चालू असतो तेव्हा तो पुजारी आवाहन करण्याच्या आंतरिक अवस्थेमध्ये स्वतःला नेतो आणि त्या मूर्तीमध्ये त्या देवतेची शक्ती यावी म्हणून त्या देवतेच्या विभूतीला किंवा एखाद्या रूपाला खाली यावे म्हणून आवाहन करण्याचा प्रयत्न करतो – जर त्या पुजाऱ्याकडे खरोखरच अशी आवाहन करण्याची शक्ती असेल तर, तो त्यामध्ये यशस्वी होतो. पण बहुधा – अर्थातच प्रत्येक गोष्टीला अपवाद असतातच – पण बहुधा या लोकांना परंपरागत सर्वसाधारण कल्पनांनुसार शिक्षण देण्यात आलेले असते. आणि त्यामुळे आवाहन करत असताना जेव्हा, ते त्या देवतेसंबंधी विचार करतात तेव्हा ते साहजिकपणेच त्या देवतांना जी रूपं प्रदान करण्यात आलेली असतात किंवा त्यांचे जे गुण सांगण्यात आलेले असतात, त्या साऱ्या गोष्टींचा ते विचार करतात आणि हे असे आवाहन हे सहसा प्राणिक विश्वातील एखाद्या जिवाला किंवा फार फार तर मानसिक विश्वातील एखाद्या जीवाला उद्देशून केले जाते पण मूळ जी देवता असते तिला उद्देशून केले जात नाही. आणि त्यामुळे

अशा मूर्तीमध्ये जे अभिव्यक्त होतात ते हे असे छोटेछोटे जीव असतात. छोट्या छोट्या देवळांमधील मूर्ती किंवा अगदी घराण्यांमध्ये असणाऱ्या मूर्तीसुद्धा – तुम्हाला माहीत आहे का की, काही जणांच्या घरामध्ये छोटेखानी देवळं बांधलेली असतात, आणि ज्या देवतांची पूजाअर्चा ते करत असतात त्या देवतांच्या मूर्ती ते त्यामध्ये ठेवतात – तेव्हा हे जीवच त्या मूर्तीच्या माध्यमातून आविष्कृत होत असतात; कधीकधी तर त्याचे परिणाम हे फारच दुर्दैवी असतात; कारण ही जी रूपं असतात ती मूळ देवदेवतांपेक्षा एवढी भिन्न असतात की... ती खरंतर त्यांची विरूपं असतात. काही घराण्यांमध्ये ज्या कालीमातेची पूजाअर्चा केली जाते ते वास्तविक राक्षसच असतात.

– श्रीमाताजी (CWM 06 : 275-276)

*

(श्रीमाताजी श्रीअरविंदलिखित The Mother या ग्रंथातील एक उतारा वाचतात. मूळ उतारा असा)

''दिव्य मातेची कार्यकारी शक्ती आणि पूर्णतेचा व सुव्यवस्थेचा भाव म्हणजे महासरस्वती. चौघींमधील सर्वात लहान असणारी ती, तिच्या कार्यकारी क्षमतेबाबत मात्र ती सर्वात कुशल असते आणि जडभौतिक प्रकृतीच्या ती सर्वात निकट असते... ती नेहमीच स्वतःमध्ये प्रकृतीला सामावून घेत असते आणि तिने ज्यांची निवड केलेली असते त्यांना ती अगदी हृदयस्थ व नेमके ज्ञान, सूक्ष्मता आणि धैर्य, अंतर्ज्ञानी मनाची अचूकता आणि जागृत हात आणि परिपूर्ण कार्यकर्त्याची भेदक नजर देऊ शकते.''

(श्रीमाताजी वरील उताऱ्यावर भाष्य करतात) आविष्करणाच्या क्रमवारीमध्ये ती सर्वात शेवटची होती. आणि तिच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकृतीनुसार, तिच्या स्पंदनांचे जे गुणधर्म असतात त्यानुसार ती लहान मुलांच्या देखील खूप निकट असते. तिला तरुण माणसं, लहान मुलं,

ज्यांची घडण अजून चालू आहे अशा गोष्टी, तसेच रूपांतरण होण्यासाठी आणि परिपूर्णत्वाला जाण्यासाठी ज्यांना अजून खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे, ज्यांच्यासमोर दूरवर जाणारा रस्ता आहे अशी माणसं तिला आवडतात. तिला बाललीलांमध्ये रस असतो. ती प्रकृतीमध्ये सर्वात लहान आहे आणि आविष्करणामध्ये तिचा क्रम सर्वांत शेवटी लागतो.

– श्रीमाताजी (CWM 04 : 402-403)

*

छायाचित्रावरील ध्यान

प्रश्न : श्रीमाताजी, जेव्हा आम्ही तुमच्या एखाद्या छायाचित्राकडे पाहून ध्यान करतो – तशी तर पुष्कळच छायाचित्रं आहेत, प्रत्येक छायाचित्रामधील भाव वेगवेगळे आहेत – ज्या छायाचित्राकडे पाहून आम्ही ध्यान करतो त्यानुसार आमच्यामध्ये काही फरक पडतो का?

श्रीमाताजी : जर तुम्ही तसे विचारपूर्वक करत असाल, तर हो, निश्चितच फरक पडतो. जर तुम्ही अमुक एखाद्या कारणासाठी हे छायाचित्र किंवा तमुक एका कारणासाठी ते छायाचित्र असे निवडले असेल तर खचितच तसा फरक पडतो. त्याचा परिणाम तसा होतो. म्हणजे जणू काही तुम्ही दिव्य मातेच्या या रूपापेक्षा त्या रूपावर ध्यान करण्याचे ठरविलेले असते.

उदाहरणार्थ, जर तुम्ही महाकालीवर किंवा महालक्ष्मीवर किंवा महेश्वरीवर लक्ष एकाग्र केलेत तर, परिणाम निश्चितपणे वेगवेगळे होतील. त्या त्या गुणांना प्रतिसाद देणारे तुमच्यातील घटक जागृत होतील आणि ते ग्रहणशील बनतील. पण जर एखाद्या व्यक्तीकडे एकच छायाचित्र असेल, मग ते कोणतेही असू देत, व्यक्ती त्या एकाच छायाचित्राकडे पाहात ध्यान करत असेल, तर ते छायाचित्र कोणते आहे याला फारसे काही महत्त्व नाही; कारण त्या व्यक्तीकडे तेवढे एकच छायाचित्र आहे. कारण जेव्हा व्यक्ती एखाद्या छायाचित्राकडे पाहात ध्यान करते त्यावेळी ती थेट

शक्तीच्या संपर्कात येते..


जेव्हा व्यक्ती एखादी विशिष्ट इच्छा बाळगून, विशिष्ट संबंधाने ध्यान करते तेव्हा त्या व्यक्तीच्या एकाग्रतेचे काही ठरावीक परिणाम असतात. अन्यथा ते संबंध अधिक व्यापक असतात आणि जी व्यक्ती ध्यान करते तिच्या गरजेची किंवा तिच्या आकांक्षेची ती नेहमीच अभिव्यक्ती असते. परंतु जर व्यक्ती पूर्णतया तटस्थ असेल, जर तिने कशाचीही निवड केलेली नसेल किंवा ती अमुक एखाद्या विशिष्ट गोष्टीची आस बाळगत नसेल, जर व्यक्ती अगदी पूर्णपणे तटस्थ राहून एखाद्या स्वच्छ कोऱ्या पानाप्रमाणे सामोरी आली तर, त्या व्यक्तीला ज्या शक्तींची आणि ज्या रूपांची आवश्यकता आहे त्या शक्ती आणि ती रूपं तिच्या त्या एकाग्रतेला प्रतिसाद देतात; त्या व्यक्तीला स्वतःलाच माहीत नसते की तिला नेमक्या कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे.

कारण फारच कमी लोक स्वतःविषयी जागृत असतात. बरेचजण काहीशा धूसर भावभावनांमध्ये जगत असतात, त्यांची अभीप्सा पण काहीशी अस्पष्ट असते आणि ती त्यांना बरीचशी अनाकलनीय असते; ती सुव्यवस्थित अशी नसते, तिच्यामध्ये समन्वय नसतो किंवा ती फारशी संकल्पपूर्वक देखील नसते, तिच्यासंबंधी पुरेशी सुस्पष्ट दृष्टी त्यांना असत नाही. उदा. व्यक्तीने कोणत्या अडीअडचणींवर मात केली पाहिजे किंवा तिने कोणत्या क्षमता प्राप्त करून घेतल्या पाहिजेत याविषयी काहीच कल्पना तिला असत नाही. तशी कल्पना असेल तर बहुधा तो बऱ्यापैकी प्रगत अशा साधनेचा परिणाम असतो.

आपल्याला नक्की काय हवे आहे याची अगदी नेमकेपणाने जाण असण्यासाठी व्यक्तीने बरेचसे चिंतनमनन केलेले असावे लागते, निरीक्षण केलेले असावे लागते, पुष्कळसा अभ्यास केलेला असावा लागतो.

– श्रीमाताजी (CWM 07 : 271-272)

**



श्रीमाताजींचे प्रतीक

अदिती, महाशक्तीचा अंक बारा आहे. त्यामुळे तो सर्वच गोष्टींना लागू पडतो, महाशक्तीच्या सर्व कार्याचे बारा पैलू असतात. तिचे बारा गुण आहेत, तिच्या बारा शक्ती आहेत, तिचे बारा पैलू आहेत आणि तिच्या आविष्करणाचे बारा स्तरही आहेत, आणि इतरही अनेक गोष्टी आहेत की ज्या संख्येने बारा आहेत. बारा हा अंक स्वयमेव एक प्रतीक आहे. हा अंक आविष्करणाचे, दुहेरी परिपूर्णतेचे म्हणजे तत्त्वतः असलेल्या परिपूर्णतेचे तसेच आविष्करणामध्ये, सृष्टीमध्ये असलेल्या परिपूर्णतेचे प्रतीक आहे.

– श्रीमाताजी (CWM 06 : 395)

*

श्रीमाताजींच्या प्रतीकाचे केंद्र म्हणजे 'अदिती', मधल्या चार पाकळ्या म्हणजे महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती.

बाहेरच्या बारा पाकळ्या म्हणजे मन:पूर्वकता, विनम्रता, कृतज्ञता, प्रयत्न-सातत्य, अभीप्सा, ग्रहणशीलता, प्रगती, धैर्य, सद्‌भाव, उदारता, समता आणि शांती.

यापैकी पहिल्या आठ गुणांनी ईश्वराप्रत काय वृत्ती असावी हे दर्शविले जाते आणि उरलेले चार गुण मानवतेप्रत काय वृत्ती असावी हे दर्शवितात.

**



Viscum album L

श्रीमाताजींनी दिलेला फुलांचा आध्यात्मिक अर्थ

चैतन्याची खूण

येथील सर्व गोष्टी म्हणजे त्या चैतन्याची अभिव्यक्ती आहे, चैतन्याचे रूप आहे, चैतन्याची ऊर्जा आहे आणि चैतन्याची कृती आहे; जडद्रव्य हेसुद्धा चैतन्याचेच एक रूप आहे; प्राण म्हणजे चैतन्यमय अस्तित्वाची शक्ती आहे; मन हे चैतन्याच्या जाणिवेचे कार्यकारित्व आहे. सर्व प्रकृती म्हणजे देवाचे दर्शन आणि देवाची लीला आहे, ती एका आध्यात्मिक अस्तित्वाची शक्ती आहे, कृती आहे आणि स्वयं-निर्मिती आहे.

– श्रीअरविंद (CWSA 13 : 325)

*

आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

२४ नोव्हेंबर १९८०

(ज्यांना ईश्वराची सेवा करण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी ही प्रार्थना.)

सर्व अडथळ्यांवर मात करून विजयी होणाऱ्या हे ईश्वरा, तुझा जयजयकार असो. आमच्यातील कोणतीही गोष्ट तुझ्या कार्यात अडथळा ठरू नये, असे वरदान दे. कशामुळेही तुझ्या आविष्करणामध्ये विलंब होऊ नये, असे वरदान दे. सर्व गोष्टींमध्ये आणि प्रत्येक क्षणी तुझीच इच्छा कार्यान्वित होऊ शकेल, असे वरदान दे. तुझा मानस आमच्यामध्ये परिपूर्ण व्हावा; आमच्या प्रत्येक तत्त्वामध्ये, आमच्या अस्तित्वाच्या प्रत्येक कृतीमध्ये, आमच्या सर्वोच्च उंचीपासून ते आमच्या देहाच्या अगदी सूक्ष्मतम अशा पेशींपर्यंत तुझीच इच्छा पूर्णत्वाला जावी म्हणून, आम्ही तुझ्यासमोर उभे आहोत. आम्ही तुझ्याशी संपूर्णतया आणि सदासर्वदा एकनिष्ठ राहू शकू, असे वरदान दे. इतर सारे प्रभाव दूर सारून आम्ही पूर्णतः तुझ्याच प्रभावाखाली राहू शकू, असे वरदान दे. आम्ही तुझ्याविषयी एक गाढ आणि उत्कट कृतज्ञता बाळगण्यास कधीही विसरणार नाही, असे वरदान दे. तुझ्याकडून प्रसादरूपाने, हरघडी मिळालेल्या अद्‌भुत गोष्टींची आमच्याकडून कधीही हेळसांड होऊ नये, असे वरदान दे. आमच्यामधील सर्व गोष्टी तुझ्या कार्यात सहभागी होऊ शकतील आणि तुझ्या साक्षात्कारासाठी सिद्ध होऊ शकतील, असे वरदान दे. सर्व साक्षात्कारांचा परमोच्च स्वामी असणाऱ्या हे ईश्वरा, तुझा जयजयकार असो. तुझ्या विजयाबद्‌दलची सक्रिय आणि उत्कट, परिपूर्ण आणि अविचल अशी श्रद्धा आम्हाला प्रदान कर.

– श्रीमाताजी

(CWM 01 : 382)

*